संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २६३ * * अमरावती * | गुरुवार, दिनांक २० मार्च २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

॥ परमात्मा एक ॥
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज


7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. ११, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## संघाची समय सूचकता

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अनेक बाबतीत जी काही भूमिका घेतो. ती अत्यंत वेगळी आणि व्यावहारिक असते. आताचा ताजा मुद्दा औरंगजेबाचा आहे. औरंगजेब मरून साडेतीनशे वर्षे झालेली आहेत. आता त्याच्या मढ्याचे भांडवल किती करावे, हाच मोठा प्रश्न आहे. औरंगजेबाचे महिमामंडन करणारे अबु असीम आझमी सारखे विद्वान आपले भारतीयच आहेत. औरंगजेबाचे जीवन सत्ता हस्तगत करण्यापासून टिकवण्यासाठी, आलेल्या व्यावहारिक क्रूरतेने भरलेले आहे. औरंगजेबाला त्याच्या सत्तेच्या हिशेबाने पाहिले. तर अगदी लहानसे असे मराठी राज्य त्याला कधीच जिंकता आले नाही. ही त्याच्या मनातील खंत खुल्ताबादच्या कबरीत तो जाईपर्यंत कायम होती. हे सुद्धा कधीच नाकारता येणार नाही. बलाढ्य मोगली सत्तेसमोर आपल्या लहानशा सैन्यानिशी गनिमी काव्याने लढणारे छत्रपती शिवाजी महाराज किंवा त्यापूर्वी काही काळ महाराणा प्रताप हे दोनच हिंदू राजे असे होते की, त्यांनी मोगली सत्तेला डोळ्यात डोळे घालून करारा-जबाब दिला होता. विशेष म्हणजे शिवाजी महाराज यांनी आग्रा येथील कैदेत असताना औरंगजेबाला जो काही चकवा दिला. त्याची जखम त्याच्या मनात शेवटपर्यंत कायम भळभळत होती. शिवाजी महाराजांच्या नंतर मराठी साम्राज्याचे दुसरे छत्रपती म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांचा छावा आणि रणधुरंदर छत्रपती संभाजी राजांनी औरंगजेबाला दहा वर्ष सळो की पळो करून सोडले होते. त्यामुळे कसेही करून संभाजी महाराजांना महाराष्ट्राच्या आणि मराठ्यांच्या सत्तेवरून कसे दूर करता येईल. याचे ठोकताळे कपटी औरंगजेबाने अनेक वेळा बांधले. पण मराठ्यांच्या या रणगाझी धैर्यधरासमोर म्हातारा औरंगजेब बुद्धीने आणि शरीराने गलितगात्र झाला होता. परंतु त्या काळतल्या संभाजी राजांच्या जवळच्याच काही गद्दारांनी संभाजी राजांना कपटाने वेढून त्यांना औरंगजेबाच्या हवाली केले. संभाजीराजांना ज्या क्रूर पद्धतीने औरंगजेबाने मारले. त्याची इतिहासात औरंगी दहशत म्हणून नोंद झालेली आहे. खरी गोष्ट अशी आहे की, जिवंत संभाजीराजे जेवढे औरंगजेबाला भारी होते. त्यापेक्षाही हालहाल करून त्यांचा जीव घेतल्यानंतर मराठ्यांची तळपती तलवार औरंगजेबाला थोपविता आलीच नव्हती. महाराणी येसूबाई औरंगजेबाच्या कैदेत असताना ताराराणी आणि आपल्या शूर मराठी वीरांनी औरंगजेबाला 'दे माय धरणी ठाय' करून सोडले होते. अखेर औरंगजेबाला पुन्हा आग्रा किंवा दिल्ली शहर पाहता आलेच नाही. आयुष्याच्या अंतिम काळात त्याच्या सत्तालोलुप शहजाद्यांमुळे औरंगजेब आधीच खचलेला होता. अशा त्या औरंगजेबाच्या कबरीला विनाकारण मोठे महत्त्व देऊन दररोज त्याच्या नावाने शिमगा करणे, बरोबर नाही. ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका निश्चितपणे आपल्या देशासाठी सुयोग्य आहे. असे म्हटले तर ते अजिबात वावगे होणार नाही. संघाचे प्रवक्ते सुनील आंबेकर यांनी आज पत्रकार परिषदेत जे विधान केले आहे. ते व्यावहारिक आणि सर्व समाजांना जोडणारे आहे. औरंगजेबासारख्या कपटी आणि चिल्लर माणसाच्या कबरीसाठी बाबरी सारखे आंदोलन करून काय होणार आहे. ही संघाची भूमिका निश्चितपणे सर्व मान्य होणारी आहे, असे आम्हाला वाटते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशाच्या सर्व समावेशकतेच्या दृष्टीने जी भूमिका मांडलेली आहे. त्या भूमिकेचे केवळ संघाचे स्वयंसेवक नाही तर विरोधी पक्षातील अनेक नेत्यांनी संघाच्या याच भूमिकेचे देशहिताची असल्याची ग्वाही देऊन संघाच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा सध्या संयुक्तिक नाही. संघाच्या या भूमिकेनंतर औरंगजेबाबत भडकावू विधाने करणाऱ्या अनेक वाचाळवीर 'नितीज्ञांना' आतातरी सुविचार सुचावे. त्यांची जीभ सुसंवादी व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेल्या काही दिवसांपासून अनेक बाबींवर व्यक्त केलेली मते स्वीकारली गेली. तर आपला सर्वधर्मसमभावी देश आणि या देशातील जनता सुखाने नांदू शकेल. संघाच्या स्वयंसेवकांबरोबर सर्वांनीच संघाच्या यथोचित भूमिकेचे मनापासून जबरदस्त स्वागत करावे, हीच आमची मनीषा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# वंडर वुमनची वापसी!

## ९ महिने १४ दिवसांनी पृथ्वीवर परतल्या सुनीता विल्यम्स : जगभरात आनंद







■ वृत्तसंस्था, फ्लोरिडा, दि. १९ :
भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर ९ महिने आणि १४ दिवसांनी पृथ्वीवर परतले आहेत. त्यांच्यासोबत क्रू-९ चे आणखी दोन अंतराळवीर आहेत, अमेरिकेचे निक हेग आणि रशियाचे अलेक्झांडर गोबुनोव्ह. त्यांचे ड्रॅगन अंतराळयान १९ मार्च रोजी भारतीय वेळेनुसार पहाटे ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर उतरले.

या चार अंतराळवीरांनी मंगळवारी (१८ मार्च) आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक सोडले. जेव्हा हे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणात आले तेव्हा त्याचे तापमान १६५० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होते. या काळात सुमारे ७ मिनिटे संपर्क तुटला, म्हणजेच अंतराळयानाशी कोणताही संपर्क झाला नाही.

ड्रॅगन कॅप्सूल वेगळे झाल्यापासून ते समुद्रात उतरेपर्यंत सुमारे १७ तास लागले. १८ मार्च रोजी सकाळी ८:३५ वाजता, अंतराळयानाचा दरवाजा उघडला गेला. १०:३५ वाजता अंतराळयान आयएसएसपासून वेगळे झाले.

१९ मार्च रोजी पहाटे २:४१ वाजता डीऑर्बिट जळण्यास सुरुवात झाली. म्हणजेच, अंतराळयानाचे इंजिन कक्षापासून विरुद्ध दिशेने चालवण्यात आले. यामुळे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करू शकले आणि पहाटे ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावरील पाण्यात उतरले.

ड्रॅगन अंतराळयान लँड झाल्यानंतर, चार अंतराळवीरांना घेण्यासाठी एक पुनर्प्राप्ती बोट आली. ड्रॅगन अंतराळयानाचे स्प्लॅशडाऊन १९ मार्च रोजी ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर झाले. ड्रॅगन अंतराळयान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील हार्मनी मॉड्यूलच्या बंदरापासून वेगळे होते.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर बोईंग आणि नासाच्या ८ दिवसांच्या संयुक्त 'क्रू फ्लाइट टेस्ट मिशन'वर गेले. या मोहिमेचा उद्देश बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानाची अंतराळवीरांना अंतराळ स्थानकात नेण्याची आणि परत आणण्याची क्षमता तपासणे हा होता.

अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावरील त्यांच्या ८ दिवसांच्या कालावधीत संशोधन आणि अनेक प्रयोग करावे लागले. पण थ्रस्टरमध्ये समस्या आल्यानंतर, त्यांचे ८ दिवसांचे मिशन ९ महिन्यांहून अधिक काळ वाढवण्यात आले.

### ४५०० वेळा पृथ्वीची परिक्रमा

सुनीता विल्यम्स व विल्मोर यांना अंतराळात फक्त ८ दिवस राहायचे होते, पण तांत्रिक अडचणीमुळे २८६ दिवस त्यांना अडकून पडावे लागले. यादरम्यान त्यांनी ४५०० वेळा पृथ्वीची परिक्रमा केली.

नासाचे अधिकारी रॉब नावियास यांनी सांगितले, अंतराळातील ही सर्वात मोठी मोहीम नसली तरी आव्हानात्मक आहे. सुनीता तीन मिशनमध्ये एकूण ६०९ दिवस अंतराळात राहिली. ती नवव्या क्रमांकावर आहे. रशियाचे ओलेग कोनोनेन्को ११११० दिवस राहून पहिल्या स्थानी आहे. टॉप १० मध्ये रशिया/ सोव्हिएत संघाचे ८ व अमेरिकेचे २ अंतराळवीर आहेत. पेगी विटसन (६७५ दिवस) यांच्यानंतर सुनीता सर्वाधिक काळ अंतराळात राहणारी अमेरिकन ठरली आहे.

### दिवाळीसारखा आनंदोत्सव

सुनीता विल्यम्सच्या सुरक्षित परतीसाठी त्यांच्या वडिलांचे गाव झुलासणमध्ये दिवाळीसारखी तयारी केली होती. सुनीता सुखरुप आल्याचे कळताच या गावात जल्लोष साजरा झाला. त्यांच्या स्वागतासाठी एक मोठी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत सुनीतांचे छायाचित्र होते. ग्रामस्थ त्यांच्या सुरक्षित परतीसाठी प्रार्थना करत होते. अखंड ज्योतही लावण्यात आली होती. ही ज्योत सुनीता अंतराळात गेल्या तेव्हापासून जळत आहे. ग्रामप्रमुख विशाल पंचाल यांनी सांगितले की, शाळकरी मुलेही १५ दिवसांपासून त्यांच्या सुरक्षित परतीसाठी रामधून गात आहेत. सुनीता यांचे वडील दीपक पंड्या यांचे मूळ गाव झुलासण आहे. ते १९५७ मध्ये अमेरिकेत गेले होते. गावातील लोक सुनीता यांच्या परतीची आतुरतेने वाट पाहत आहेत.

## युक्रेन युद्धावर ट्रम्प-पुतिन यांच्यात ९० मिनिटे चर्चा

### युद्धबंदीवर चौथ्यांदा चर्चा

■ वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. १९ :
युक्रेन युद्धात युद्धबंदीबाबत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील फोनवरून झालेली चर्चा संपली आहे. दोन्ही नेत्यांनी युद्धबंदीच्या प्रस्तावावर ९० मिनिटे चर्चा केली.

या संभाषणाचा तपशील अद्याप उघड झालेला नाही. दोन्ही नेत्यांमधील चर्चा भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:३० वाजता सुरू झाली. तथापि, पुतिन यांचे व्यवसाय प्रतिनिधी किरील दिमित्रीव्ह म्हणाले की, आज पुतिन आणि ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली जग अधिक सुरक्षित झाले आहे. गेल्या दोन महिन्यांत दोन्ही देशांमध्ये युक्रेन युद्धावर चार वेळा चर्चा झाली आहे. यापूर्वी १२ फेब्रुवारी, २७ फेब्रुवारी, १३ मार्च रोजी चर्चा झाली.

रशियन राष्ट्राध्यक्षांनी जी-७ देशांची खिल्ली उडवत म्हटले आहे की ते इतके लहान आहे की ते नकाशावर दिसत नाही. आता पाश्चात्य देशांचे जगावरील नियंत्रण संपत आहे.

राजधानी मॉस्कोमध्ये भाषण देताना पुतिन म्हणाले की, पाश्चात्य देशांनी आपल्यावर लादलेल्या २८,००० हून अधिक निर्बंधांमुळे रशियन अर्थव्यवस्थेला हानी पोहोचवण्यात अपयश आले आहे.

युरोपियन कमिशनचे अध्यक्ष म्हणाले की, रशियासह इतर धोक्यांमुळे युरोपला आपली संरक्षण क्षमता वाढवावी लागेल. त्यांनी या योजनेला रेडीनेस-२०३० असे नाव दिले.

रशियाच्या अध्यक्षीय कार्यालय क्रेमलिनने म्हटले आहे की, अमेरिका आणि युरोपने युक्रेनला शस्त्रास्त्रांचा पुरवठा थांबवावा, अशी पुतिन यांची इच्छा आहे. जर शांतता करार झाला तर युक्रेनमध्ये शांतता सैन्य तैनात करण्याचा फ्रान्स आणि ब्रिटनचा प्रस्ताव इटलीच्या पंतप्रधानांनी नाकारला. ते म्हणाले की याचा काही उपयोग होणार नाही.

# गुन्हेगारीमध्ये महाराष्ट्राचा देशात ८ वा क्रमांक

### मुख्यमंत्री फडणवीसांची विधानसभेत माहिती



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत बोलताना राज्यातील गुन्हेगारीची आकडेवारी मांडली.

गुन्हेगारीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आठव्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दिल्ली, केरळ, हरियाणा, तेलंगणा, मध्य प्रदेश, ओडिशा, आंध्र प्रदेश ही प्रमुख राज्ये महाराष्ट्राच्या पुढे असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच दोन दिवसांपासून चर्चेत आलेल्या नागपूर शहराचा सातवा क्रमांक लागत असल्याचे ते म्हणाले.

फडणवीस म्हणाले, दिल्ली, केरळ, हरियाणा, तेलंगणा, मध्य प्रदेश, ओडिशा, आंध्र प्रदेश ही राज्य क्राइम रेटमध्ये आपल्या पुढे आहेत. शहरांचा विचार केला तर पहिल्या पाचमध्ये महाराष्ट्रातील एकही शहर नाही. पहिल्या दहामध्ये सातव्या क्रमांकावर नागपूर दिसते. पण ते यासाठी दिसते की नागपूरमध्ये आपण नागपूर ग्रामीणचा जवळपास २५ टक्के भाग हा सामील केला.

२०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये गुन्ह्यांच्या संख्येत २५८६ ने घट झाली, अशी माहिती यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली.

### बेशिस्त नियम खपवून घेतले जाणार नाहीत

राज्यातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी सोशल मीडियावर रील्स तयार करून आपण काम करत असल्याचे भासवतात. आता अशा बेशिस्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सरकार नवीन जीआर काढणार आहे. बेशिस्त नियम खपवून घेतले जाणार नाहीत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमदार परिणय फुके यांनी यासंदर्भात लक्षवेधी मांडली होती. त्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सदरील माहिती दिली. आमदार परिणय फुके यांनी अधिकार आणि कर्मचाऱ्यांसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी मांडली होती. अधिकारी आणि कर्मचारी वर्ग रिल्स टाकतात. यातून राज्य तेच चालवतात असा भास निर्माण करतात. यासंदर्भात कडक नियम आणि कारवाई करणे आवश्यक आहे, असे परिणय फुके म्हणाले होते. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त उत्तर दिले.

### एमपीएसच्या भरती प्रक्रियेत देखील कॅलेंडर

यूपीएससीच्या धर्तीवर राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरती प्रक्रियेत देखील कॅलेंडर निश्चित केले जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. एमपीएससीची परीक्षा या वर्षीपासून आपण डिस्क्रिप्टिव्ह स्वरूपात घेणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. यासाठी काही नागरिकांचा विरोध आहे. मात्र हा विरोध ग्राह्य धरणार नाही, लवकरच एमपीएसच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात भरती करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

## त्यांना कबरीतूनही खोदून काढू..



नागपूरमध्ये घडलेल्या दंगलीची सध्या राज्यभर चर्चा चालू आहे. खुद्द मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात अशा प्रकारच्या गोष्टी घडत त्यासंदर्भात देवेंद्र फडणवीसही विरोधकांच्या निशाण्यावर आल्यानंतर याबाबत राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू झाली. विधानसभेत यासंदर्भात मंगळवारी दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर निवेदन दिलं. आता नागपूरमधील परिस्थिती पूर्वपदावर येऊ लागली असून पोलिसांकडून दोषींना शोधून काढण्याचं काम चालू आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीसांनी पुन्हा एकदा विधानसभेत निवेदन दिलं आहे.

फडणवीसांनी मंगळवारी विधानसभेत केलेल्या निवेदनात नागपूरमधील दंगलीच्या कारस्थानाचा भाग असल्याचे म्हटले होते. मात्र, नागपूरचे पोलीस आयुक्त वेगळी माहिती देत असून मुख्यमंत्री वेगळी भूमिका मांडत असल्याचा मुद्दा नाना पटोले यांनी उपस्थित केला. त्यावर फडणवीसांनी भूमिका स्पष्ट केली.

पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांना अद्दल घडवणारच, या भूमिकेचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केला. मी पुन्हा सांगतो, नागपूर प्रकरणात ज्यांनी पोलिसांवर हल्ले केले असतील, त्यांना कबरीतूनही खोदून काढू. सोडणार नाही. बाकी सगळ्या गोष्टी क्षम्य आहेत. पण पोलिसांवर हल्ला क्षम्य नाही. त्यामुळे त्यांच्यावर कठोरातली कठोर कारवाई नियोजित वेळेत केली जाईल, असं फडणवीस म्हणाले.

# उपराजधानीची स्थिती पूर्वपदावर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :
सोमवारच्या दंगलीनंतर तिसऱ्या दिवशी नागपूर शहराची स्थिती पूर्वपदावर आली आहे. काही भागातील संचारबंदीत सूट देण्यात आली असली तरी, महाल, हंसापूरी आणि अन्य संवेदनशिल भागात अद्यापही पोलिसांचा तगडा बंदोबस्त आहे.

पोलिसांनी नागपुरातील ११ पोलीस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी सोमवारी रात्रीपासून जाहीर केली. त्यामुळे महाल, चिटणीसपुरा चौक, भालदारपुरा, बडकस चौक, इतवारी सराफा बाजार, इतवारीतील किराणाओळी, गांधीबाग, गोळीबार चौक, मोमीनपुरा, टिमकी, हंसापुरी, जुना भंडारा रोड, तीन नळ चौक, गितांजली चौक, इतवारी दहीबाजार, शांतीनगर, सतरंजीपुरा, शांतीनगर, कसाबपुरा, डोबीनगर, इतवारी बाजार या मध्य नागपुरातील जुन्या बाजारपेठा आणि लोकवस्तीमध्ये संचारबंदी आहे.

या भागातील औषधाची दुकाने आणि रुग्णालय वगळता सर्व दुकाने बंद आहेत. या भागात दुचाकी आणि चारचाकी वाहनांना प्रवेश नाही. जमावबंदी आदेश लागू असल्याने महाल, गांधी गेट, शिवाजी पुतळा, जुना फवारा चौक, चिटणीसपुरा चौक या भागात कटेकोट पोलीस बंदोबस्त आहे.

या भागात कोणालाही प्रवेश नाही. परंतु स्थानिक नागरिकांना पायदळ फिरण्यास परवानगी दिली आहे. केवळ एकत्रित येण्यास मज्जाव करण्यात आला आहे. सेंट्रल ॲव्हेन्यूवरील वाहतूक सुरू आहे.

## शेतकरी व केंद्रातील चर्चेचा ७ वा टप्पा अनिर्णीत

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :
हरियाणा-पंजाबच्या शंभू आणि खनौरी सीमेवर १३ महिन्यांपासून आंदोलन करणारे शेतकरी आणि केंद्र सरकारमधील चर्चेचा ७ वा टप्पा बुधवारी अनिर्णीत राहिला.

सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत ही चर्चा चालली. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, पीयूष गोयल आणि प्रल्हाद जोशी यांच्यासह शेतकरी नेते त्यात सहभागी झाले होते. बैठकीनंतर शेतकरी शंभू आणि खनौरी सीमेवर परतत असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. यामध्ये किसान मजदूर मोर्चा (केएमएम) चे निमंत्रक सर्वन पंढेर आणि संयुक्त किसान मोचार्चे (गैर-राजकीय) जगजीत डल्लेवाल यांचा समावेश आहे.

पंढेर यांना मोहालीतील एअरपोर्ट रोडवर अटक करण्यात आली, तर डल्लेवाल रुग्णवाहिकेतून खानौरी सीमेवर परतत होते; पोलिसांनी त्यांना संगरूरमध्ये घेरले. यानंतर पोलिसांनी डल्लेवालना रुग्णवाहिकेसह ताब्यात घेतले.

दोन्ही नेत्यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. याशिवाय शेतकरी नेते काका सिंग कोटरा, अभिमन्यू कोहाड, मनजीत राय, ओंकार सिंग यांनाही ताब्यात घेण्यात आले. शेतकऱ्यांना पटियाला येथील कमांडो सेंटर (बहादुरगड) येथे हलवण्यात येत असल्याची माहिती आहे. पोलिसांनी शंभू सीमेवरील शेतकऱ्यांचे शेड उघडण्यास सुरुवात केली आहे.

## इतिहास संशोधक प्रा. मा. म. देशमुख यांचे निधन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :
परिवर्तनवादी चळवळीचे मार्गदर्शक, थोर इतिहास संशोधक प्रा. मा. म. देशमुख सर यांचे बुधवारी पहाटे निधन झाले . सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मा. म. देशमुख हे एक महान तत्त्वज्ञ, इतिहास संशोधक होते. विविध पुस्तके व व्याखाने देऊन त्यांनी लोकजागृती केली. प्रा. मा. म. देशमुख हे महाराष्ट्राच्या पुरोगामी इतिहासातील व चळवळीत गाजलेले नाव आहे. ते नागपूरच्या धनवटे नॅशनल कॉलेजमधून इतिहास विषयाचे विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाले होते.

'मध्ययुगीन भारताचा इतिहास' या ग्रंथामुळे त्ते वादात सापडले होते. या ग्रंथावर महाराष्ट्र शासनाने बंदी घातली होती. पण अखेरपर्यंत लढून देशमुखांनी हायकोर्टाकडून बंदी उठवली.

मा म. सरांच्या इतिहास संशोधनाचा प्रतिवाद काही लेखक संशोधनातून करू न शकल्यामुळे त्यांनी मा. म. देशमुख यांची जिवंतपणी प्रतिकात्मक प्रेतयात्रा काढली. नागपुर विद्यापीठासमोर ग्रंथाची होळी केली.

त्यावेळी सुशिक्षित, सुज्ञ बहुजन समाजातील विद्यार्थी आणि तरूणांनी सरांची प्रेतयात्रा काढणाऱ्यांना पिटाळून लावले आणि लगेच प्रा. मा. म. देशमुख यांची गौरव मिरवणुक काढली.

पुण्यातील शनिवारवाडा हाच जिजाऊंचा खरा लालमहाल आहे असे पुराव्यासहीत सिद्ध करणारे, इतिहासात लपवलेला आणि शिवरायांवर तलवारीने वार करणारा अफजलखानाचा वकील कृष्ण भास्कर कुलकर्णी सर्वप्रथम आपल्या लेखणीतून समाजासमोर आणणारा हा तेजस्वी तारा आज निखळल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.

अभिनव अभिरूप, अभ्यास असा करावा, जय जिजाऊ, प्राचीन भारताचा इतिहास, बहुजन समाज आणि परिवर्तन, बौद्ध धम्म आणि शिवधर्म, भांडारकर झॉकी है, शनिवारवाडा बाकी है, मध्ययुगीन भारताचा इतिहास, मनुवादी शिवस्मारक होऊ देणार नाही, मनुवाद्याशी लढा (नववी आवृती), मराठा कुणबी समाजाची दशा आणि दिशा, मराठ्यांचे दासीपुत्र (संपादित), युगप्रवर्तक शिवराज आणि मराठ्याची शौर्यगाथा, रामदास आणि पेशवाई, वंश भाषा श्रेष्ठत्व आणि सत्य, राष्ट्रनिर्माते, शिवराज्य, शिवशाही, सन्मार्ग, समाज प्रबोधन, साहित्यिकांची जबाबदारी अशी त्यांची विपूल ग्रंथसंपदा आहे.

### हिंजवडी परिसरात मिनी बसला आग

## ४ कामगारांचा होरपळून मृत्यू



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :
पुणे शहरातील हिंजवडी परिसरात एका मिनी बसला आग लागल्याची भयंकर घटना घडली आहे. या घटनेत ४ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला असून, दोघे जण गंभीर भाजलेत.

कंपनीच्या कामगारांना घेऊन चाललेल्या टेम्पो ट्रॅव्हलरला ही आग लागली. यात चार जणांचा होरपळून मृत्यू झाला तर दोन जण जखमी आहेत. जखमींपैकी चालकाची प्रकृती गंभीर आहे. या बसमध्ये एकूण १२ कामगार होते. मात्र, मागचा दरवाजा न उघडल्याने ही चौघांचा होरपळून मृत्यू झाले.

या घटनेत टेम्पो जळून खाक झाला आहे, तर टेम्पोमध्ये चौघांचा होरपळून मृत्यू झाला आहे. संबोधित चौघे ही हिंजवडी मधील खासगी कंपनीचे कर्मचारी होते. व्योमा ग्राफिक्स कंपनीचे एकूण १२ कर्मचारी या टेम्पोमध्ये प्रवास करत होते. हिंजवडी फेज वनमध्ये चालकाच्या पायाखाली अचानक आग लागली. त्यावेळी चालक आणि पुढचे कर्मचारी तातडीने खाली उतरले. मात्र, मागचे दार न उघडल्याने संबंधित भीषण घटना घडली. जखमींना पुण्यात रुबी हॉल क्लिनिक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

# डॉक्टरचे २० लाखांच्या खंडणीसाठी अपहरण

## आरोपीला बेड्या ; पिस्तुलासह २ काडतुसे जप्त



■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १९ : पुणे जिल्ह्यातील आंबेगाव परिसरात मंचरमधील एका नामांकित डॉक्टरचे सराईत गुन्हेगाराने अपहरण करून २० लाखांची खंडणी मागत गोळीबार केल्याचा प्रकार घडला होता. डॉक्टरकडून एक लाखांची खंडणी घेऊन त्यांना निर्जन स्थळी सोडून पसार झालेल्या आरोपीला अटक करण्यात पुणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेला यश आले आहे. आरोपीच्या ताब्यातून देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

प्रवीण उर्फ डॉलर सीताराम ओव्हाळ (वय ३२, रा. वाळद, ता. खेड, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत संबंधित डॉक्टरने मंचर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली होती. तक्रारदार डॉक्टर ४ जानेवारी रोजी पेठ ते मंचर या मार्गावरून दुचाकीवरून जात होते. मोटारचालक आरोपी पवन सुधीर थोरात (रा. मंचर, जि. पुणे) आणि ओव्हाळ त्यांच्या मागावर होते.

दुचाकीस्वार डॉक्टरला कारने जोरात धडक दिल्याने ते रस्त्यात पडल्यावर त्यांचे जबरदस्तीने अपहरण करून निघोटवाडी परिसरात चोरट्यांनी नेले. तेथे त्यांना बेदम मारहाण करुन २० लाख रुपयांची खंडणी मागितली. डॉक्टरांना धमकावून त्यांनी पिस्तुलातून एक गोळी देखील हवेत झाडली, तसेच त्यांच्याकडून एक लाख रुपयांची खंडणी उकळली. त्यानंतर पेठ घाटात डॉक्टरला सोडून आरोपी थोरात आणि ओव्हाळ कारमधून पसार झाले.

डॉक्टरांनी याप्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानंतर पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी घटनास्थळी भेट देऊन आरोपींना पकडण्याच्या सूचना दिल्या होत्या. आरोपी ओव्हाळ आणि थोरात सराईत गुन्हेगार असून, त्यांच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, बेकायदा शस्त्र बाळगणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले आहेत.

फरार झालेला आरोपी थोरात याला पोलिसांनी अटक केली. त्याच्याबरोबर असलेला ओव्हाळ पसार झाला होता. गेले दोन महिने पोलीस ओव्हाळच्या मागावर होते. पसार झालेला ओव्हाळ आळेफाटा एसटी स्थानक परिसरात येणार असल्याची माहिती पोलिस कर्मचारी अक्षय नवले यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून ओव्हाळला पकडले. त्याच अंगझडती घेण्यात आली. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली.

पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलिस कर्मचारी दीपक साबळे, अक्षय नवले, संदीप वारे, राजू मोमीन, मंगेश थिगळे, विक्रम तापकीर, नीलेश सुपेकर यांनी ही कामगिरी केली. प्रकरणाचा पुढील तपास आळेफाटा पोलिसांकडून करण्यात येत आहे. आरोपी ओव्हाळ याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

## पुणे शहरात कौशल्य विकास केंद्र उभारणार मंत्री उदय सामंत

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १९ : शिक्षण आणि रोजगाराच्या मोठ्या संधी असलेल्या पुणे शहरात विद्यार्थ्यांसह तरुण-तरुणींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील तरुणाईच्या कौशल्य विकासासाठी लवकरच कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत एक भव्य कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा नगर विकास मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत केली. पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट गावांतील समस्या या विषयावर विधानसभेत सदस्य विजय शिवतारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य भीमराव तापकीर यांनीही सहभाग घेतला.

या चर्चेला उत्तर देताना मंत्री सामंत म्हणाले की, पुणे महापालिकेतील फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे वगळून उर्वरित सर्व गावांचा महापालिकेत समावेश झाला आहे. फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन्ही गावांसाठी स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. या नगरपरिषदेला 'अ' वर्ग दर्जा देण्यासंदर्भात कोकण विभागीय आयुक्तांचा अहवाल प्राप्त होताच तो दर्जा देण्यात येईल. महानगरपालिकेकडून सेवांचे हस्तांतरण पूर्ण होईपर्यंत या नगरपरिषद क्षेत्रात पायाभूत सुविधांची कामे सुरु राहतील, असेही मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. मालमत्ता कराच्या मुद्द्यावर महत्त्वाची घोषणा नव्याने समाविष्ट गावांमध्ये मालमत्ता कर दुपटीने वाढवून वसूल केला जाणार नाही. ग्रामपंचायत कराच्या दुपटीपेक्षा जास्त कर आकारला जाणार नाही, असे स्पष्ट करत हे दर पुनर्विलोकन होईपर्यंत वसुलीस स्थगिती देण्यात आल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

फुरसुंगी कचरा डेपोमुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच जांभुळवाडी तलावातून पाणीपुरवठा योजनांसाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार केला जाईल आणि तलावाचे सुशोभीकरणही करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट ३२ गावांच्या समस्या सोडवण्यासाठी लवकरच उच्चस्तरीय बैठक घेण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी जाहीर केले. फुरसुंगी आणि उरुळी देवाची परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी पाणीपुरवठा वेळापत्रक बनवण्यात येईल, असेही ते म्हणाले. या घोषणेमुळे पुण्यातील नव्याने समाविष्ट गावांसह नागरिकांना दिलासा मिळणार असून, कौशल्य विकास केंद्रामुळे तरुणाईसाठी रोजगाराच्या संधी वाढण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## मानव मुक्तीचा सत्याग्रह

२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १४२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १४२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १४ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे

१) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे.
२) स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत.
३) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित
४) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे.

याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेवश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेवश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु , अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ४४२२५४६३४५**

## डावलेल्या इच्छुकांनी नाराजी झटकली ; २१ जागांवर डोळा ठेवत सुरु केली आमदारकीची तयारी!

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १९ : महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठी झालेली पोटनिवडणूक बिनविरोध पार पडली असून राज्याला नवीन पाच आमदार मिळाले आहेत. भाजपकडून दादाराव केचे, संजय केनेकर, संदीप जोशी, राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडके तर शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी यांची विधान परिषदेवर निवड झाली आहे. मात्र, या निवडणुकीदरम्यान तिन्ही पक्षांतून ज्यांची नावे चर्चेत होती, पण संधी न मिळालेल्या इच्छुकांमध्ये नाराजीचं वातावरण निर्माण झालं आहे. ही यादी मोठी असली तरी, या इच्छुकांनी आता नाराजी झटकून पुन्हा तयारीला सुरुवात केली आहे. कारण, विधान परिषदेच्या आणखी तब्बल २१ जागा सध्या रिक्त आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात या जागांवर डोळा ठेवून इच्छुकांनी आपापल्या पद्धतीने लॉबिंग आणि फिल्डिंग लावायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्र विधान परिषद ही सदस्यीय असून यातील सदस्य विधानसभा सदस्यांकडून निवडले जातात, २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून,७ पदवीधर मतदारसंघातून, ७ शिक्षक मतदारसंघातून आणि १२ सदस्य राज्यपालांकडून नामनिर्देशित केले जातात. काही दिवसांपूर्वी राज्यपाल नियुक्त१२ पैकी ६ सदस्यांची नियुक्ती झाली असून उर्वरित ६ जागा अजून रिक्त आहेत. याशिवाय, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका रखडल्यामुळे २२ पैकी तब्बल १५ सदस्य निवृत्त झाले असून त्यांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे सध्या राज्यपाल नियुक्त ६ आणि स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १५ अशा एकूण २१ जागा रिक्त आहेत.

याशिवाय पुढील वर्ष अखेरीस आणखी १४ जागा रिक्त होणार आहेत. यामध्ये संभाजीनगर मतदारसंघाचे आमदार अंबादास दानवे यांची २४ ऑगस्ट रोजी, तर विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या४, शिक्षक मतदारसंघातील २ आणि पदवीधर मतदारसंघातील ३ अशा एकूण १४ आमदारांची मुदत संपत आहे.

त्यामुळे येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची लॉबिंग सुरू होणार असून भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात मोठा राजकीय संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

### अंबादास दानवे यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

दरम्यान, विधान परिषद पोटनिवडणुकीच्या प्रक्रियेवर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांना पत्र लिहिले आहे. त्यांनी एकाच कालावधीत रिक्त झालेल्या जागांसाठी एकत्रित निवडणूक का घेतली जात नाही? याबाबत स्पष्टीकरण मागितले आहे. तसेच या प्रक्रियेत कोणताही पक्षपातीपणा अथवा अपारदर्शकता होऊ नये यासाठी निवडणूक आयोग कोणते उपाय करतो, याची माहिती देण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर, पुढील काही महिन्यांत विधान परिषद निवडणुकीच्या संदर्भात मोठा राजकीय कलगीतुरा रंगण्याची शक्यता असून, इच्छुकांसह सर्वच पक्षांसाठी ही एक मोठी संधी असणार आहे.

## भाजपला हिंदुत्व अन्य छत्रपती शिवाजी महाराज यांचा विचार ठेवायचा नाही:अंबादास दानवे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १९ : भाजपला हिंदुत्व आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा विचार ठेवायचा नाही. यांना असे दाखवायचे आहे की हा देश आम्ही बनवला आहे, शिवरायांचा यात कुठेही रोल नाही, असे म्हणत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी भाजपवर टीका केली आहे. औरंगजेबाची कबर जर यांना काढून टाकायची असेल तर काढावी. काल या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय बोलले हे देखील पाहिले पाहिजे. केंद्र सरकार कबरीला सुरक्षा देत आहे. केंद्राचे साडे सहा लाख रुपये सुरक्षेसाठी आले आहेत, असे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे. तर सिंधुदुर्गच्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी २५० रुपये येतात. सरकार कुणाचे आहे? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. विरोधी पक्षनेते पदाबाबत प्रश्न हे विधानसभा अध्यक्षांना विचारायला हवे.



### लक्ष हटवण्यासाठी औरंगजेबाचा मुद्दा

अंबादास दानवे म्हणाले की, तुमचे केंद्रात आणि राज्यात सरकार आहे तुम्हाला जे करायचे ते करा. बाकी गोष्टी करत आहात तर हे ही करा. पण राज्याचे वातावरण का खराब करत आहात, असा सवाल त्यांनी केला आहे. राज्याच्या आर्थिक स्थितीवर, महिलांवर होणाऱ्या अत्याचारावर किंवा इतर मुद्द्यावर चर्चा होऊ नये म्हणून लक्ष विचलित करण्यासाठी औरंगजेबाचा मुद्दा पुढे करण्यात आल्याचा आरोप दानवेंनी केला आहे.

### भाजपच्या लोकांना निवडणुकीचीच चिंता

अंबादास दानवे म्हणाले की, भाजपच्या लोकांना निवडणुकीचीच चिंता आहे. लोकांबद्दल यांना काही आत्मियता नाही. सर्व राज्यात वेगवेगळ्या पद्धतीने वातावरण खराब करण्याचे काम भाजपकडून सुरू आहे. दंगली घडवण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे. हे निवडणुकीसाठीच वातावरण निर्मिती करत आहे हे बाळासाहेब आंबेडकर यांचे वक्तव्य अगदी योग्य आहे. कोरटकर, सोलापूरकर, अबूआझमी यांनी वक्तव्य केले. पण त्यांच्यावर कारवाई झाली नाही.

### पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई व्हावी

अंबादास दानवे म्हणाले की, पोलिसांवर ज्यांनी कुणी हात टाकला असेल त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. पोलिसांच्या वर्दीचा सन्मान सर्वांनीच केला पाहिजे. ही आमची भूमिका आहे, असे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.


अंबादास दानवे म्हणाले की, नागपूरमध्ये झालेल्या दंगलीमध्ये जे घडले त्यात पोलिसांनी सांगितले त्यात आणि मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनात खूप फरक आहे. दोन्ही वक्तव्य वेगळी येत आहे. प्रत्यक्षदर्शी अन मुख्यमंत्री यांनी सांगितले यांच्यात फरक असल्याचे दिसून येत आहे.

## रस्त्यांची कामे पूर्ण करणार मंत्री उदय सामंत

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १९ : अकोला शहरात केंद्र सरकारच्या अमृत २.० अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणावर मलनिःस्सारण प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार आहे. या प्रकल्पाअंतर्गत शहरातील विविध भागात भुयारी मलवाहिन्यांचे जाळे टाकले जाणार असून, त्यासाठी मंजुरी मिळालेल्या आणि स्थगित असलेल्या ९६ रस्त्यांवर प्रथम काम सुरू करण्यात येईल, अशी माहिती नगरविकास मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिली. अकोला शहरातील या महत्वाच्या प्रकल्पासंदर्भात सदस्य साजिद पठाण यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य अर्जुन खोतकर यांनीही सहभाग घेतला. यावर उत्तर देताना मंत्री सामंत म्हणाले की, मलनिःस्सारण प्रकल्पामुळे रस्त्यांमध्ये खोदकाम होणार आहे. त्यामुळे बाधित होणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येईल. यासाठी तब्बल ८३ कोटी रुपयांचा विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. रस्त्यांची दुरुस्ती तसेच पुनर्बांधणीच्या कामांसाठी महानगरपालिकेला स्पष्ट निर्देश दिले जातील.

## नागपूरमधील घटनेला काँग्रेसच जबाबदार

### रावसाहेब दानवे यांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १९ : औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यातील राजकारण तापले असून मंगळवारी रात्री नागपूर शहरात हिंसाचार उसळला होता. नागपूरमधील हिंसाचाराच्या घटनेवरुन सत्ताधारी आणि विरोधकांचे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरू आहेत. त्यातच आता भाजपचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी काँग्रेसवर मोठा आरोप केला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीसांबाबत केलेल्या विधानामुळे नागपूरमधील घटना घडली, असा दावा रावसाहेब दानवे यांनी केला आहे. रावसाहेब दानवेंच्या या विधानामुळे आता पुन्हा वेगळाच राजकीय वाद उद्भवण्याची शक्यता आहे. नागपूरमधील हिंसाचारावरून महाविकास आघाडीतील पक्षांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. मंत्रिमंडळातील एका मंत्र्याच्या विधानामुळे नागपूरमधील घटना घडली असा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. तर भाजपकडूनही विरोधकांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले जात आहे. अशात नागपूरमधील घटनेला काँग्रेसच जबाबदार असल्याचे रावसाहेब दानवे यांनी म्हटले आहे. रावसाहेब दानवे म्हणाले की, नागपूरमध्ये मंगळवारी रात्री घडलेल्या काँग्रेसच जबाबदार आहे. कारण, काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रणनीतीची तुलना थेट औरंगजेबासोबत केली होती. हर्षवर्धन सपकाळ यांचे हे वक्तव्य चुकीचे असून त्यांच्या या वक्तव्यामुळेच नागपूरची घटना घडल्याचा दावा रावसाहेब दानवे यांनी केला. नागपूरच्या घटनेचा मी निषेध करतो, मात्र महाराष्ट्रात अशा घटना घडल्या नाही पाहिजे, असेही दानवे म्हणालेत. कुणाचीही औरंगजेबाशी तुलना योग्य नाही दरम्यान, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार हे हर्षवर्धन सपकाळ यांच्या मतांशी फारकत घेताना दिसले. मी हर्षवर्धन सपकाळ हे काय बोलले ऐकले नाही. मात्र देवेंद्र फडणवीस असो कि आणखी कोणी असो, कोणाची अशी औरंगजेबाशी तुलना करणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया विजय वडेट्टीवार यांनी दिली.

...तर राज्य कसे सुरक्षित ठेवणार?

## सुषमा अंधारेंचा फडणवीसांवर हल्लाबोल



मुंबई, दि. १९ : नागपूरमध्ये महिला पोलिस कर्मचाऱ्यांच्या अंगावर हात टाकल्याची बातमी येतेय. गृहखात्यासाठी ही अतिशय लाजिरवाणी बाब आहे. आपल्या खात्याच्या कर्मचाऱ्यांना गृहमंत्री सुरक्षित ठेवू शकत नसतील तर राज्य सुरक्षित कसे सुरक्षित ठेवणार? असा सवाल ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, नीतेश राणेसारख्या अतिशय भंपक, बेताल माणसाला जाणीवपूर्वक मोकळीक देणे ही फडणवीसांची पूर्वनियोजित योजना आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. नागपूरमध्ये सोमवारी रात्री झालेल्या हिंसाचारादरम्यान पोलिसांवर झालेल्या हल्ल्यात ३३ पोलस जखमी झाले.

ही दंगल सुरू असताना काही समाजकंटकांनी महिला पोलिसाचा विनयभंग केल्याच्या घटना समोर आली आहे. यावरुन अंधारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारवर टीकास्त्र डागले आहे.

## बोगस कागदपत्रांआधारे मुंबईहून लंडनला जाणारे ८ जण अटकेत



■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १९ : बनावट कागदपत्रांच्या आधारे प्राध्यापक आणि विद्यार्थी असल्याचे भासवून लंडन येथे जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या आठ जणांना मुंबई विमानतळावर अटक करण्यात आली. हे सर्व विद्यार्थी हरियाणातील आहेत. यातील तिघेजण हे अल्पवयीन आहेत. मानवी तस्करीचा हा प्रकार असल्याचा पोलिसांना संशय आहे. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत असल्याचे सांगण्यात आले. सहार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास दोन तरुणांनी मुंबई विमानतळावरील इमिग्रेशन काऊंटरवर पडताळणीसाठी त्यांचा पासपोर्ट आणि व्हिसा सादर केला. त्यांच्याकडे इंग्लंडचा व्हिजिट व्हिसा होता. हरियाणातील एका विद्यापीठाचे विद्यार्थी असून प्राध्यापकांसह लंडनला जात असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, इतर प्रश्न विचारल्यानंतर त्यांना समाधानकारक उत्तरे देता आली नाही.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता त्यांच्यासह आणखी जण लंडनला जाणार असल्याची माहिती मिळाली. या सर्वांना गुन्हे शाखेच्या स्वाधीन करण्यात आले. त्यांच्यावर पारपत्र कायद्याच्या कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हे प्रकरण गुन्हे शाखेला वर्ग करण्यात आले असून ते याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. व्हिसा मिळवण्यासाठी खोटी माहिती सादर केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांची सुटका करण्यात आली.

## भाजपच्या पोटात नवा शिवाजी वाढतोय

### उद्धव ठाकरे गटाची टीका

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १९ : छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्रात एकोपा निर्माण केला. आज मात्र महाराष्ट्र दुभंगला आहे व धर्मद्वेषाने पेटला आहे. कुराणाची प्रत कोठे मिळाली तर सन्मानाने परत करा असे छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र सांगते. मात्र नागपुरात कुराणातील आयती जाळण्याचा प्रकार झाला. राजापुरात होळींचे खांब मशिदीत घुसवून दंगल घडविण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रात पेटवापेटवी सुरू आहे ती औरंगजेबाच्या नावाने. चारशे वर्षांपूर्वी गाडलेला औरंग्या पुन्हा जिवंत केला गेला आहे. कारण भाजपच्या पोटात नवा शिवाजी वाढतो आहे. छत्रपती शिवाजी महाराज, आम्हाला माफ करा! अशा शब्दात उद्धव ठाकरे गटाने भाजपवर निशाणा साधला आहे. त्यांनी दैनिक सामनाच्या माध्यमातून ही टीका केली आहे.



मुख्यमंत्री फडणवीस हे राणाभीमदेवी थाटात फक्त भाषणे करतात, पण प्रत्यक्षात कृती मात्र काहीच करीत नाहीत हे वारंवार दिसत आहे. औरंगजेबाच्या कबरीवरून नागपुरात दंगल उसळली. पोलिसांवर हल्ले झाले. नागपुरात जाळपोळीचा भडका उडाला. नागपूरला ३०० वर्षांचा इतिहास आहे. या ३०० वर्षांत कधी दंगल घडल्याची नोंद नाही. मग आताच भडका का उडाला? फडणवीस म्हणतात, हे दंगलखोर बाहेरचे होते. बाहेरचे दंगलखोर शहरात येऊन हैदोस घालीपर्यंत पोलीस काय करीत होते? गृहखात्याचे गुप्तचर झोपा काढीत होते काय? असे प्रश्न निर्माण होतात. बीडमध्ये खंडण्या, हत्यासत्र संपलेले नाही. परभणीतही दंगल झाली. कोकणात होळीच्या सणात नवहिंदुत्ववाद्यांनी दंगलीची ठिणगी टाकली.

राज्याचे मंत्री धार्मिक द्वेष वाढेल अशी भाषणे देतात व गृहमंत्री हात चोळत बसले आहेत. याला राज्य करणे म्हणत नाहीत. औरंगजेबाचे महिमामंडन महाराष्ट्रात कोणीच करणार नाही.

येथे फक्त छत्रपती शिवरायांचाच जयजयकार होईल. त्यामुळे छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल या संघटनांनी आणि भाजपमधील नवहिंदुत्ववादी चोंगट्यांनी औरंगजेबाच्या कबरीविरुद्ध राजकीय रौद्ररूप धारण केले व महाराष्ट्रातले वातावरण बिघडवले.

### येथे कारसेवेचीही गरज नाही

**औरंगजेबाची कबर कायमची उद्ध्वस्त करावी या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने आंदोलन करण्याची धमकी दिली. कबर हटविण्यासाठी कारसेवा करण्याची योजना जाहीर केली. औरंग्याच्या कबरीची तुलना ते अयोध्येतील बाबरी मशिदीशी करत आहेत.**

**बाबरीप्रमाणे औरंग्याची कबर तोडू असे हे लोक सांगतात. त्यासाठी हे लोक कुदळ, फावडी, पहारी, जेसीबी, बुलडोझर वगैरे गोळा करायला लागले. ही सरळ सरळ नौटंकी आहे. औरंग्याची कबर तोडायला हा तमाशा करण्याचे कारण नाही. औरंग्या कबरीखाली आहे व तो काही उठून बाहेर येत नाही.**

**कबरीस आता राज्य राखीव सुरक्षा दलाचे संरक्षण आहे. ही कबर भारताच्या पुरातत्व खात्याच्या अंतर्गत असल्याने त्याचे बाप केंद्रात बसले आहेत. केंद्राने लगेच हे संरक्षण हटवावे आणि कबरीस जो संरक्षित वास्तूचा दर्जा दिला तो काढून घ्यावा.**

**म्हणजे ही जमीन मोकळी होईल व संघर्षाचा भडका उडणार नाही. येथे कारसेवेचीही गरज नाही.**

# पोलिस उपनिरीक्षकासह खासगी व्यक्तीवर एसीबी ट्रॅप

## पाच हजाराच्या लाचेची मागणी




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )** - ट्रॅक्टर-ट्रॉली सोडण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच मागणाऱ्या नांदगाव खंडेश्वर ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षकासह एका खासगी व्यक्तीला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली. पोलिस उपनिरीक्षक दर्शन पुंडलीक दिकोंडवार (38, रा. शिरे लेआउट, चौधरी हॉस्पीटल रोड, अवधुतवाडी, यवतमाळ जि. यवतमाळ) व खासगी इसम सुकेश अनिल सारडा (29, रा. नांदगाव खंडेश्वर) यांच्याविरुद्ध 18 मार्च रोजी नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तकारदार यांनी 12 मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरुन लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने 13 मार्च रोजी पडताळणी केली असता, लोकसेवक पोलिस उपनिरीक्षक दर्शन पुंडलीक दिकोंडवार याने तक्रारदार यांच्या वडीलांच्या नावे असलेली ट्रक्टरची ट्रॉली सोडुन देण्याकरीताता पाच हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे तसेच सदर पाच हजार रुपये सुकेश सारडा यांच्याजवळ देण्यासाठी सांगितले. त्यावेळी सुकेश सारडा हे तकारदार यांना म्हटले की, 'मी तुला फोन केल्यावर येवुन जा', यावरून एसीबी पथकाला माहिती पडले की, आरोपी लोकसेवकाने लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर एसीबी पथकाने 13 मार्च रोजी सापळा रचला. परंतू आरोपी लोकसेवकाला तक्रारदार यांच्यावर संशय आला. त्यामुळे त्यांनी तकारदार यांच्याकडुन लाच रक्कम घेतली नाहीत. त्यामुळे एसीबी पथकाने 18 मार्च रोजी आरोपी लोकसेवक दर्शन पुंडलीक दिकोंडवार व सुकेश अनिल सारडा यांना ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणात दोन्ही आरोपींविरुध्द नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, अभय आष्टेकर, पोलीस उपअधिक्षक मंगेश मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक चित्रा मेसरे, केतन माजरे, पोलिस हवालदार प्रमोद रायपुरे, पोलीस अंमलदार शैलेश कडु, अंमलदार वैभव जायले, चालक सतिश किटुकले यांनी पार पाडली.

# राज बागरी प्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी पत्करली लाचारी?

## आठ महिन्यानंतर नोटीस बजावून आवभगत ■ अटक न करता चौकशी करुन सोडले






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )** - आपल्या सेवापुस्तिकेवर खाडाखोड करुन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गेल्या सहा महिन्यांपासून फरार असलेले तत्कालीन डेप्युटी आरटीओ राज आनंद बागरी उर्फ राजू बागडे (वर्धेकर) यांच्या प्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी शुध्द लाचारी पत्करत माती खाल्ल्याचे दिसत आहे. आठ महिन्यांपासून एकही नोटीस न बजाविता ऐन वेळेवर नोटीस बजावून अटक न करता चौकशीच्या नावावर बागरींची आवभगत करुन रवानगी केली. गाडगे नगर पोलिसांना ही लाचारी का पत्करावी लागली याबाबत चर्चेला उधाण आले आहे.

सेवानिवृत्ती झाले असताना आपल्या सेवापुस्तिकेवर खाडाखोड करुन जन्मवर्षात वाढ करत सलग 17 महिने उपभोगली. याप्रकरणी दैनिक महासागर ने वृत्त मालिका चालवित भंडाफोड केल्यावर बागरी यांच्या प्रकरणी आरटीओ आयुक्तांच्या आदेशाहून उपायुक्त(लेखा) विद्यासागर हिरमुखे यांच्या एक सदस्यीय चौकशी समितीने चौकशी करित राज बागरी हे ज्या महाविद्यालयात शिकले त्या महाविद्यालयातून त्यांचे मूळ कागदपत्रे हस्तगत केले. ज्यामध्ये पुढे आले की, राज बागरी यांनी आपली टीसी, बोर्ड सर्टीफिकेट आदी कागदपत्रांमध्ये खाडाखोड केल्याचे पुढे आले. तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या परवानगीनंतर व वरिष्ठांच्या आदेशाने येथील गाडगे नगर पोलिसात शुक्रवार दि.23 ऑगस्ट रोजी गुन्हे दाखल करण्यात आले.

शासनातर्फे अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) मोटर वाहन निरीक्षक कैलाश संभाजी भरकाडे यांनी दिलेल्या तक्रारीमध्ये बागरी यांनी शासनाची 18 लाख, 13 हजार, 950 रुपयांनी आर्थिक फसवणूक केल्याचे नमूद करण्यात आले. बागरी यांच्या विरुध्द तक्रार दिली. त्यानंतर राज बागरी यांच्यावर कलम 120(ब), 467, 468, 471, 420 भारतीय न्याय संहिते अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते.

### सात महिन्यांपासून गाडगेनगर पोलीस झोपेत

एखाद्या प्रकरणात एखाद्या व्यक्तीला अटक करायची असेल तर त्या व्यक्तीला किमान दोन नोटीस देणे गरजेचे असते. त्या नोटीसला जर सदर व्यक्ती उपस्थित झाला नाही, तर त्याला अटक करता येते. परंतु गाडगे नगर पोलीस राज बागरी प्रकरणी सात महिन्यांपासून झोपेत असल्याचे दिसत आहे. सात महिन्यांपुर्वी गुन्हा दाखल होवूनही एकही नोटीस त्यांना बजाविण्यात आली नाही. उलट अटकपुर्व जामीन घेण्याकरिता धडपड करत असलेले राज बागरी यांना कुठल्याच न्यायालयाने जामीन दिला नाही. अश्या परिस्थितीत त्यांना अटक करणे आवश्यक असताना गाडगे नगर पोलिसांनी सात महिन्यानंतर नोटीस बजावून राज बागरी यांची आवभगत केली.

> अटक का केली नाही, हे आम्ही सांगू शकत नाही. आम्ही त्यांना बागरींना काल नोटीस दिली, ते आज तपासकामी हजर झाले. ऐवढेच सांगू शकतो.
>
> **ब्रम्हा गिरी,**
> **ठाणेदार, गाडगे नगर.**

### असे आहेत प्रकरण

अमरावती प्रादेशिक परिवहन विभागाचे डेप्युटी आरटीओ राज बागरी यांनी आपल्या सेवापुस्तिकेच्या पहिल्या पानावर खाडाखोड करुन आपले मूळचे सन 1964 असलेले जन्म वर्ष 1965 व त्यानंतर 1966 केले. सन 2022 मध्येच सेवानिवृत्ती झालेली असताना शासनाच्या सेवेत ते 17 महिने कायम राहीले. परिवहन आयुक्त कार्यालयातील उपायुक्त व तत्कालीन अवर सचिव यांनी सेवा पुस्तिकेच्या छायांकित प्रतीच्या भरवश्यावर राज बागरी यांना एकवेळा नाही, तर सलग दोन वेळा सेवानिवृत्ती वाढवून दिली होती.

### जुन्या गुन्ह्यांना नवे नियम

1 जुन 2024 पासून लागू झालेल्या भारतीय न्याय संहितेप्रमाणे सात वर्षापर्यंत शिक्षा असलेल्या प्रकरणात अटक न करण्याचे प्रावधान आहे. वास्तवात बागरी यांच्या भारतीय दंड संहितेच्या कलम 120(ब), 467, 468, 471, 420 अन्वये गुन्हा दाखल केला होता. त्याप्रमाणे कलम 420 मध्ये सात वर्षापर्यंतच्या शिक्षेचे प्रावधान आहे. इतकेच नाहीतर हा अजामिनपात्र गुन्हा आहे. असे असतानाही बागरी यांना या प्रकरणातून सुरक्षित बाहेर काढण्याकरिता खुद्द पोलीसच जंग जंग पिछाडीत असल्याचे दिसत आहे.

> 7 वर्षापर्यंत शिक्षा असलेल्या प्रकरणात आरोपीला अटक करने बंधनकारक नाही. परंतु पोलिसांना तपासाकरिता सदर व्यक्तीला अटक करता येते, तसे कारण त्यांना द्यावे लागते.
>
> **ॲड.प्रशांत देशमुख,**
> **कायदेतज्ञ.**

# क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक महागात

## डॉक्टरांची 11.81 लाखांची फसवणूक




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )** - क्रिप्टो करन्सीमध्ये चांगला नफा मिळवून देण्याच्या नावाखाली शहरातील साई नगर परिसरातील सुशील नगर येथील रहिवासी असलेल्या 44 वर्षीय डॉक्टरची 11.81 लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना 31 जानेवारी 2025 ते 4 मार्च 2025 दरम्यान घडली. डॉ. नीरज विनायकराव काकडे यांच्या फिर्यादीवरून सायबर सेल पोलिसांनी चार अज्ञात आरोपींविरुद्ध मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.

साईनगर परिसरातील सुशील नगर येथे राहणारे नीरज काकडे यांना 31 जानेवारी रोजी अज्ञात क्रमांकावरून फोन आला. त्यामध्ये आरोपींनी क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करण्याबाबत सांगितले. गुंतवणुकीवर चांगला नफा देण्याचे आमिष दिले. त्यानंतर नीरज काकडे यांनी एकूण 11 लाख 81 हजार 830 रुपयांची गुंतवणूक केली. पण काही दिवसांनी नीरजला पैसे काढायचे होते, तेव्हा त्याला ते पैसे काढता आले नाहीत. आरोपींशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही आणि फोनही उचलला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच नीरज काकडे यांनी एनसीसीआर पोर्टल नॉलेजमेंटवर तक्रार दाखल केली. नीरज काकडे यांनी सायबर सेल पोलिस ठाण्यात संबंधित मोबाइलधारक व बँक खातेदारावर कारवाई करण्यासाठी तक्रार दाखल केली. सायबर सेल पोलिसांनी चार अज्ञात आरोपींविरुद्ध कलम 318 (4), 319 (2), कलम 66 (सी), 66 (डी), आयटी कायदा 2000 नुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# विजेच्या धक्क्याने 5 शेळ्या दगावल्या

## ■ भातकुलीची गणोरी मार्गावरील घटना ■

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )** - शेतातील तारेच्या कंपाऊंडमधील विजेच्या धक्क्याने पाच शेळ्या दगावल्याची घटना 18 मार्च रोजी भातकुली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गणोरी रोडवर घडली होती. रिना दादाराव तायडे (वय 28, रा. बाजार रोड, भातकुली) यांच्या फिर्यादीवरून भातकुली पोलिसांनी रामेश्वर चिन्नूजी लांजेवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार रिना तायडे यांच्या घरात 20 शेळ्या आहेत. 18 मार्च रोजी सकाळी 9 वाजता रीना या गणोरी मार्गावर शेळ्या चरण्यासाठी घेऊन गेली होती. दुपारी दोनच्या सुमारास शेळ्या चरत असताना लांजेवार यांच्या शेतात पोहोचल्या. जिथे रामेश्वर लांजेवार यांच्या शेतातील पाच शेळ्या तारेच्या कंपाऊंडच्या संपर्कात आल्या आणि त्यांना विजेचा जोरदार धक्का लागला. त्यामुळे शेळ्या मृत्यूमुखी पडल्या. रामेश्वर लांजेवार यांनी शेतातील पिके वन्य प्राण्यांपासून वाचवण्यासाठी तारेच्या कंपाऊंडमध्ये विद्युत प्रवाह सोडला होता. त्यामुळे रीना तायडे यांच्या पाच शेळ्या दगावल्या. रीना तायडे यांच्या तक्रारीवरून भातकुली पोलिसांनी रामेश्वर लांजेवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# रेल्वेसमोर उडी घेत आत्महत्या

## नवीन अकोला रेल्वे ट्रॅकची घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )**- वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नया अकोला रेल्वे ट्रॅकवर एका 40 वर्षीय व्यक्तीने रेल्वेसमोर येऊन आत्महत्या केल्याची घटना 18 मार्च रोजी सकाळी घडली. संजय सहदेवराव सवाई (40, नवीन अकोला, अमरावती) असे मृताचे नाव आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संजय सवाई यांना दारूचे व्यसन होते. सतत मद्यपान केल्याने त्यांचे यकृत खराब झाले होते.

17 मार्च रोजी रात्री 7 वाजता संजय दारूच्या नशेत आला, त्याने पत्नी व मुलांना शिवीगाळ केली आणि दारू पिण्यासाठी पैशाची मागणी करून आईशी वाद घातला. मात्र 18 मार्च रोजी सकाळी संजयने अचानकपणे नया अकोला येथील रेल्वे रुळावर जाऊन रेल्वेसमोर येऊन आत्महत्या केली. वलगाव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# नाबालिकेवर अत्याचार



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.19 )** - चिखलदरा तालुक्यातील लाखेवाडा येथील 17 वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली. यातील तरुणी ही 5 महिन्यांची गर्भवती झाली आहे. लग्नाला नकार दिल्याने याप्रकरणी आरोपी राम भुरा सावलकर (वय 20 वर्ष) याच्या विरोधात बलात्कार चा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया करण्यात आली आहे.



# दुचाकी चोर अटकेत

## राजापेठ पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.19 )**- राजापेठ पोलिसांनी 19 मार्च रोजी एका दुचाकी चोराला अटक केली. कुणाल सतिश आत्राम (वय 22 वर्ष, रा. गाडगे नगर, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून राजापेठच्या गुन्ह्यातील एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

पोलिस सुत्रानुसार, कुणाल सुधीर गुप्ता (रा. लक्ष्मी नारायण नगर, अमरावती) यांनी सन 2015 मध्ये आई वर्षा गुप्ता यांच्या नावे ॲक्टिवा मोपेड 3 जी गाडी क्र. एम. एच. 27 बि. एल. 5626 घेतली. ते मोपेड वाहन कुणाल गुप्ता चालवित होते. दरम्यानच कुणाल गुप्ता यांनी त्यांचे मोपेड वाहन हे घरासमोरील कंपाऊंडचे समोर उभे केले.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना घरासमोर मोपेड वाहन दिसुन आले नाही. त्यामुळे वाहन कुणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. त्यांनी या घटनेची तक्रार राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम 303 (2) प्रमाणे गुन्हा नोंदविला. याप्रकरणात राजापेठच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला पेट्रोलिंग करताना गुप्त माहिती मिळाली की, एक संशयित इसम हा ग्रे रंगाची विना नंबरची ॲक्टीवा दुचाकी गद्रे चौकात विकण्याच्या उद्देशाने फिरवत आहे. या माहितीवरुन पोलिसांनी गद्रे चौकात जावुन सदर इसमास ताब्यात घेतले आणि त्याची विचारपूस केली. त्यावेळी त्याने नाव कुणाल सतिश आत्राम असे सांगितले. पोलिसांनी त्याला विना नंबरच्या वाहनाने कागदपत्रे मागितले असता, त्याने उडवाउडवीची उत्तर दिली. त्यामुळे पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता, त्याने सदर वाहन 27 जुलै 2024 रोजी रात्री लक्ष्मीनारायण नगरातून चोरी केल्याची कबुली दिली आहे. सदर कार्यवाही ही पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक मिलींद हिवरे, पोलिस हवालदार सागर सरदार, पवन तिवारी, दिनेश भिसे, पंकज गाठे, सुरज मेश्राम, संजय कडु व चालक निलेश पोकळे यांनी केली.

# अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा 15 एप्रिलपासून

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी 2025 परीक्षांना 15 एप्रिलपासून प्रारंभ होत आहे. त्या अनुषंगाने परीक्षा विभागाने नियोजन चालविले असून वेळापत्रक जाहिर करण्यात आले आहेत. यात सर्व सत्राच्या सम आणि विषम परीक्षांचा समावेश असणार आहे.




अधिसूचना क्रमांक 16/ 2025 अन्वये उन्हाळी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. तर दुसरीकडे परीक्षार्थ्यांकडून उन्हाळी परीक्षांसाठी आवेदन पत्र मागविले जात आहे. ही कार्यवाही महाविद्यालयांना करावी लागणार आहे. त्यानुसार विद्यापीठाने प्राचार्यांना कळविण्यात आले आहे. परीक्षा विभागाने प्रकाशित केलेल्या अनुसूचीनुसार विद्या शाखानिहाय 122 अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात आले आहे. सीबीसीएस नवीन, विधी, अभियांत्रिकी, एनईपी पीजी, फार्मसी, कला, वाणिज्य, विज्ञान, गृहविज्ञान शास्त्र, एनईपी यूजी, शारीरिक शिक्षण आदी परीक्षांचा समावेश असणार आहे.

> उन्हाळी परीक्षांमध्ये साधारणत: दीड लाख परीक्षार्थी आवेदन सादर करतात. त्या अनुषंगाने अमरावती, अकोला, वाशिम, बुलडाणा, यवतमाळ या पाचही जिल्ह्यातील 183 महाविद्यालयाच्या केंद्रांवर या परीक्षा घेण्यात येतील. तयारी वेगाने केली जात आहे.
>
> **डॉ. नितीन कोळी,**
> **संचालक,**
> **परीक्षा व मूल्यमापन मंडळ, अमरावती विद्यापीठ**

### असे आहे परीक्षांचे वेळापत्रक

- 15 एप्रिलपासून पुढे : सत्र पद्धतीमधील सर्व विषम सत्राच्या परीक्षा व वार्षिक पद्धतीमधील परीक्षा
- 19 मेपासून पुढे : सत्र पद्धतीमधील सर्व विषम सत्राच्या परीक्षा, एनईपी (यूजी) सत्र 1 परीक्षा व वार्षिक पद्धतीमधील एनएईपी (पीजी)
- 19 जूनपासून पुढे : बी.ए (सीजीएस) सत्र- 2, बी.ए. (सीबीसीएस) सत्र -1 आणि सत्र -2, एन.ई.पी. (पीजी) सत्र- 4, एन.ई.पी. (यूजी) सत्र- 2 अभ्यासक्रमाच्या परीक्षा तसेच शासनस्तरावर प्रवेश होणाऱ्या अभ्यासक्रमांच्या द्वितीय सत्राच्या परीक्षा आदी.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, हॉटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, हॉटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# राष्ट्रीय महामार्गावर अवैध वृक्षतोड

## राष्ट्रीय उपमहामार्ग विभागाची पोलिसात तक्रार



**महासागर प्रतिनिधी**

*अंजनगाव सुर्जी, ( दि.19 )- राष्ट्रीय महामार्ग 548 सी अंजनगावसुर्जी ते अकोटदरम्यानच्या लखाड नजीक अवैधरित्या पाच-सहा कडूनिंबाची झाडे तोडण्यात आल्याचा प्रकार पुढे आला आहे. याबाबत अकोला येथील राष्ट्रीय उपमहामार्ग विभाग 1 चे उपविभागीय अधिकारी यांनी 19 मार्च रोजी अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.*

### सीसीटीव्ही फुटेज तपासावे

या मार्गावर असलेल्या एका धरम काट्यावर 19 मार्च रोजी सकाळी तोडलेल्या वृक्षांच्या लाकडाने भरलेले वाहन वजन करण्याकरिता गेल्याची माहिती महामार्गावरून जाणारे सुजाण नागरिकांनी सांगत आहे. या मार्गावरील धर्म काट्यावरील तसेच बाजूला असलेल्या पेट्रोल पंपावरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तपासल्यास वृक्षतोड करणाऱ्यांचा शोध लागण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे पोलीस काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

माझ्याकडे अजूनपर्यंत तक्रार आली नसून आल्यानंतर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**दिनेश वाळके**
**वनपरिक्षेत्राधिकारी, वन विभाग, परतवाडा**

अंजनगाव सुर्जी तालुक्यात अवैध वृक्षतोड चालू असून वृक्षतोड करण्यापूर्वी झाडालगत आग लावली जाते. त्यामुळे आगीची झळ लागल्याने झाड सुकून खाली कोसळते. त्यानंतर ते झाड तोडून त्याचा विल्हेवाट लावण्याचा प्रकार तालुक्यात सलग सुरुच आहे. अशातच 18 मार्च रोजी अंजनगाव सुर्जी ते अकोट मार्गावरील लखाड स्थित पेट्रोल पंप परिसरातील रस्त्यालगत असलेले कडुनिंबाचे पाच ते सहा झाडे अवैद्यरित्या तोडून नेण्यात आले. याबाबत वन विभागाला विचारणा करण्यात आली असता राष्ट्रीय महामार्गावरील वृक्ष आमच्या अधिकार क्षेत्रात नसल्याचे सांगण्यात आले. याबाबत राष्ट्रीय महामार्ग अकोला विभागाचे कार्यकारी अभियंता अश्विन चव्हाण यांनी पाहणी केली. त्यानंतर त्यांनी 19 मार्च रोजी अंजनगाव पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी चौकशी सुरु केली आहे. अंजनगाव पोलीस वृक्षतोड करणाऱ्यांचा शोध घेणार की नाही, याकडे आता लक्ष लागले आहे. अवैध वृक्षतोड करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे मागणी तालुक्यातील वृक्षप्रेमींनी केली आहे.

# 23 मार्चला चिखलदऱ्यात मेळघाट रंगोत्सव

## नागरिकांनी सहभागी व्हावे

## जिप सीईओंचे आवाहन



**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा,( दि.19 )** - होळी हा मेळघाटातील सर्वात महत्त्वाचा उत्सव. त्या निमित्ताने बाहेरगावी रोजगारासाठी गेलेले मेळघाटातील रहिवासी आपल्या मूळ गावी परतत असतात. या सर्व नागरिकांना अत्यावश्यक सेवा सुविधा पुरविणे तसेच त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी देण्यासाठी मेळघाट रंगोत्सव 2025 चे आयोजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेले आहे. 23 मार्च रोजी सकाळी 10 वाजता एक दिवसीय उत्सवाला चिखलदरा येथील गिरीवन हायस्कूल समोरील कवायत मैदानावर प्रारंभ होणार आहे. या रंगोत्सवामध्ये मेळघाटातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांनी केले आहे.

या मेळघाट रंगोत्सवामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. त्यामध्ये स्थानिक लोकनृत्य स्पर्धा, स्थानिक पारंपारिक वेशभूषा स्पर्धा आणि मेळघाटात उपलब्ध असणार्या धान्य व पदार्थांपासून रुचकर व पोषक पाककृती स्पर्धांचे देखील आयोजन केले आहे. विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. याशिवाय या शिबिरामध्ये अशा सुविधा नागरिकांना देण्यात येणार आहेत ज्यांच्या अभावी त्यांना विविध योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येतात. यामध्ये आधार कार्ड काढणे व आधार सीडिंग करणे, बँक खात्याला आधार कार्ड जोडणे, मोबाईल नंबर जोडणे, घरकुल, नरेगा, लाडकी बहीण अशा विविध योजनांचा निधी मिळण्यात येणार्याप अडचणी सोडवण्याची व्यवस्था, आपल्या बँक खात्याची केवायसी करणे, महसूल व ग्रामविकास विभागाकडून घ्यावयाच्या विविध दाखल्यांसाठी स्टॉल असणार आहेत. ग्री स्टॅग योजनेच्या नोंदणीसाठी देखील व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य विभागाचे आयुष्यमान भारत कार्डचे गोल्डन कार्डमध्ये रूपांतर करण्यासाठी देखील सुविधा या ठिकाणी देण्यात येणार आहे. याशिवाय विविध आजारांची तपासणी, नेत्र तपासणी शिबिर, सिकलसेल तपासणी, मौखिक आरोग्याची तपासणी इत्यादी तपासणी या ठिकाणी करण्यात येणार आहेत. या सोबतच महिला बचत गटांद्वारे उत्पादित वस्तूंसाठी स्टॉल देखील असणार आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक संदेश देणारे पथनाट्य आणि मान्यवरांचे मार्गदर्शन देखील या ठिकाणी लाभणार आहे. या कार्यक्रमासाठी अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अनिल बोंडे, खा. बळवंत वानखडे तसेच मेळघाटचे आमदार केवलराम काळे आणि विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांची उपस्थिती लाभणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने मेळघाट रंगोत्सवाचे आयोजनाची तयारी करण्यात येत आहे.

# जरुड येथे पक्षांकरिता जलपात्र व घरट्यांचे वाटप

## हरी सेवा फाऊंडेशनचा उपक्रम | बाळासाहेब देशमुख शाळेत आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.19 )** - स्व. प्रतापसिंह उपाख्य बाळासाहेब देशमुख जरुडकर माध्यमिक विद्यालय येथे हरी सेवा फाऊंडेशन तर्फे पक्षी संवर्धनाकरिता शाळेतील विद्यार्थ्यांनी घरटे आणि जलपात्र वाटप करण्यात आले. परिसंस्थेची साखळी अबाधित ठेवण्यामध्ये पक्ष्यांची भूमिका महत्त्वाची असते. वाढत्या उन्हामुळे पक्ष्यांच्या प्रजाती लुप्त होत आहे. त्यामुळे त्यांचे संवर्धन होणे गरजेचे असल्याने शाळेमध्ये हरी सेवा फाऊंडेशन तर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.

पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये पक्ष्यांची भुमिका या विषयावर हरी सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन खेरडे यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. याप्रसंगी हरी सेवा फाउंडेशनचे सचिव रामभाऊ राऊत यांनी स्वत: तयार केलेले घरटे व जलपात्रांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ. मनोहर आंडे यांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले. उमेश निस्ताने यांनी विद्यार्थ्याना परिसरातील विविध घटकांवर प्रश्न विचारले. वरूड तालुक्यातील पक्ष्यांच्या विविध प्रजातीविषयी माहिती पक्षीमित्र चंद्रकांत शिंगरवाडे यांनी दिली. शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र काळे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. वरुड तालुक्यातील असलेल्या पर्यावरणातील विविध घटकाविषयी सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करुन विद्यार्थ्यांमधील चिकित्सक वृत्तीला प्रेरणा देण्यात आली. यावेळी हरी सेवा फाऊंडेशनचे पदाधिकारी किशोर काळमोरे, महेश बोरकुटे, उमेश कांडलकर, डॉ. आकाश आंडे, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन प्रज्वला साबळे यांनी केले.

# येवदा येथील पाणीपुरवठा समस्या तात्काळ निकाली काढा

## निवेदनातून मागणी, आंदोलनाचा दिला इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर ( दि. 19 )** - तालुक्यातील येवदा गावात ग्रामस्थांना सतत पाणीपुरवठा समस्यांचा सामना करावा लागतोय. या समस्यांचा तात्काळ निपटारा करण्यात यावा, अशी मागणी येवदा ग्रामपंचायतचे सरपंच अमानुल्लाखा दिलावरखा यांनी जीवन प्राधिकरणकडे (दि.17) निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमुद केले आहे की, दर्यापूर-अंजनगाव या दोन तालुक्यातील 156 गावे व 2 शहर योजनेअंतर्गत येवदा गावातील नागरिकांना दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. याशिवाय, नवीन टाकीला जोडणी, गावातील गळतीची दुरुस्ती तसेच आठवडी बाजारातील पाण्याची जुनी टाकी नूतनीकरण करण्याच्या मागणीसह, येवदा ग्रामस्थांच्या विविध समस्या तात्काळ सोडविण्यात याव्या. जीवन प्राधिकरणाच्या ढिसाळ कारभारामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोष वाढत आहे व यामुळे स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन व लोकप्रतिनिधींना सतत ग्रामस्थांचा रोष सहन करावा लागत आहे. यामुळे, या समस्यांचा तात्काळ निपटारा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी सरपंच अमानुल्लाखा दिलावरखा यांनी केली आहे. तसेच या समस्यांचा निपटारा न झाल्यास, 18 मार्च रोजी दर्यापूर येथील मजीप्रा कार्यालयात तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता विवेक सोळंके आणि उपविभागीय अधिकारी विजय शेंडे यांना दिला आहे.

# शिवाजीनगरात उभारला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा

## शहराच्या सौंदर्यीकरणात मानाचा तुरा



महाराजांचा पुतळा बसवण्यात आल्यामुळे परिसराचे सौंदर्यीकरण झालेच आहे. यामुळे महाराजांच्या विचारावर चालणारी पिढी सुद्धा निर्माण होणार आहे. आजच्या युवकांनी महाराजांचे विचार आत्मसात करून त्यांच्या विचारावर चालावे.

**गोलू यादव, शहर प्रमुख शिवसेना,**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे ( दि. 19 )** - शहरातील शिवाजीनगरात घोड्यावर स्वार असलेला शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला. पुतळ्याच्या आजूबाजूला सौंदर्यीकरण करण्यात आले. यामुळे शहराच्या सौंदर्यीकरणात मोठी भर पडली आहे.

मागील अनेक वर्षापासून शहरातील शिवाजीनगर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात यावा, या जनतेच्या मागणीला यश मिळाले आहे. वैशिष्ट्यपूर्ण निधी अंतर्गत शिवसृष्टीचे सौंदर्यीकरण करण्याकरिता 40 लक्ष रुपये मंजूर करण्यात आले. या निधीतून शहरातील शिवाजीनगरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला आहे. याचे उद्घाटन रविवार मान्यवर व शहरातील शिवभक्त मावळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी जय भवानी जय शिवाजीच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमला होता.

# नाल्यात ट्रक शिरल्याने दोन जखमी

## पन्नालाल नगरमधील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 19 )** - शहरातील पन्नालाल नगरमध्ये चुरीने ट्रक रस्ता अचानक अनियंत्रत होऊन सुरक्षा कठडे तोडून नाल्यात शिरल्याने दोन जण जखमी झाले. ही घटना सोमवारी सकाळी आठ वाजताच्या सुमारास घडली. अनेकवेळा नाल्यात सुरक्षा भिंत बांधण्याची मागणी करण्यात आली, मात्र महापालिकेने निधी न दिल्याने हे काम होऊ शकले नाही. त्यामुळे नाल्याच्या पाण्यामुळे रस्त्याचा खालचा भाग पोकळा झाला आणि खचल्या गेला. त्यामुळे हा अपघात झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी पन्नालाल नगर नाल्याच्या बाजूला सुरक्षा भिंत बांधण्यासाठी आंदोलन केले होते. मात्र निधीची कमतरता असल्याचे कारण सांगून महापालिका सुरक्षा भिंत बांधली नाही. अशातच सोमवारी सकाळी ट्रक क्रमांक एमएच 04 बीयू 7302 पन्नालालनगर मार्गाने जात असताना, अचानक रस्ता खचला आणि ट्रक अनियंत्रीत होऊन सुरक्षा कठडे तोडून नाल्यात शिरला. यामध्ये ट्रकचा चालक आणि अन्य एक जण गंभीर जखमी झाला. नागरिकांनी तातडीने मदत करत दोघांनाही बाहेर काढले.

### तीव्र निषेध करणार

सुरक्षा भिंतीअभावी हा मार्ग मोकळा झाला आहे. अनेकवेळा भिंत बांधण्याच्या हालचाली झाल्या. मात्र महापालिकेने लक्ष दिले नाही. लवकर काम न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

**मिलिंद बांबल, माजी स्थायी समिती सभापती**

# गजानन भक्ताने साकारलेले चित्र श्रीं चरणी अर्पण

## योगिता कुबडेंची मुंडगाव संस्थानला भेट



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.19 )** - डॉ. योगिता योगेश कुबडे (कांडलकर) यांनी स्वत: साकारलेले सुंदर कलर पेंटिंग आकोट तालुक्यातील श्री गजानन महाराज पादुका संस्थानला भेट म्हणून दिले. श्री चरणी आपण अल्पशी सेवा अर्पण केली असल्याची भावना गजानन भक्त असलेल्या योगिता कुबडे यांनी यानिमित्ताने व्यक्त केली आहे.

डॉ. योगिता कुबडे कांडलकर ह्या गव्हर्नमेंट आर्ट व डिझाईन महाविद्यालय तसेच क्रिएटिव्ह आर्टिस्ट, नागपूर येथे सहाय्यक प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी एम. एफ. ए., पीएचडी (क्रिएटिव्ह पेंटिंग) शिक्षण घेतलेले आहे. डॉ. योगिता यांना उल्लेखनीय कार्याकरिता अनेक मानाचे राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी अनेक ग्रुप शो केलेले आहे. तसेच दिल्ली, पुणे, अहमदाबाद, भोपाल, बंगलोर, बडोदा येथील प्रसिद्ध गॅलरी मध्ये राष्ट्र स्तरीय चित्रकला प्रदर्शनीत त्या सहभागी झाल्या आहेत. पादुका संस्थानला हजारो भाविक विविध मार्गाने देणगी स्वरूपात, अन्नदान, श्रमदानाच्या रूपाने मदत करीत असतात. अशातच डॉ. योगिता यांनी अथक परिश्रम घेऊन सुंदर भेट दिली आहे. पादुका मंदिराकरता त्यांनी गजानन महाराजांवर असलेल्या श्रद्धेच्या कुंचल्याने काढलेल्या प्रतिमेत त्यांची स्वत:ची प्रतिभा, कला, आस्था, सेवाभाव दिसून येत आहे. या सुंदर चित्रात श्री गजानन महाराजांचे परमभक्त मुंडगावच्या संत बायजाबाई, संत पुंडलिक महाराज भोकरे, श्री झामसिंग महाराज राजपूत व श्रींच्या मूळ पादुकांचे हुबेहूब चित्रन केले आहे. त्यांनी काढलेल्या या सुंदर अप्रतिम चित्राची श्रींच्या भक्तांकडून खूप प्रशंसा होत आहे.

# जिल्ह्यातील महावितरणची 11 हजार प्रकरणे लोक अदालतीत निकाली निघणार

## अभय योजनेची मुदत 31 मार्च ; भरघोस सवलतीत लाभ घेण्याची शेवटची संधी | 22 मार्च राष्ट्रीय लोक अदालत नियोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )** - जिल्ह्यात विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांची 11 हजार 555 प्रकरणे तडजोडीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली आहे. तथापि ही सर्व प्रकरणे दाखलपूर्व असल्याने अभय योजनेत लाभ घेण्यास पात्र आहेत. परंतू अभय योजना 31 मार्चला संपत असल्याने व्याज, विलंब आकारासह अनेक सवलतीत लाभ घेण्याची शेवटची संधी असल्याने या सर्व ग्राहकांनी लोक अदालतीमध्ये सहभाग नोंदवून वादातीत प्रकरणातून कायमची सुटका करावी, असे आवाहन अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी केले आहे.




22 मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालत नियोजित आहे. जिल्हा आणि सर्व तालुका स्तरावर सुरू राहणाऱ्या लोक अदालतीमध्ये तडजोडीकरीता महावितरणची एकुण 11 हजार 555 प्रकरणे ठेवण्यात आली असून त्यांच्याकडे त्यांच्याकडे 15 कोटी 35 लाख रूपये थकले आहे.यामध्ये सर्वात जास्त घरगुती ग्राहकाचा समावेश असून त्याची संख्या 10 हजार 752 आहे. परंतू प्रकरण वादातीत झाल्यामुळे त्यांच्याकडे 11 कोटी 34 लाख रूपये थकले आहे. वाणिज्यिक वर्गवारीतील 541 ग्राहकांकडे 80 लाख, औद्योगिक वर्गवारीतील 182 ग्राहकाचा यात समावेश असून त्यांच्याकडे 3 कोटी आणि इतर 80 ग्राहकांकडे 20 लाख रूपये थकीत आहे. मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात तसेच सहाय्यक विधी अधिकारी आद्यश्री कांबे यांच्या विशेष पुढाकाराने आणि सर्व विभागीय कार्यकारी अभियंते यांच्या मदतीने ग्राहकांच्या सोयीनुसार तालुकानिहाय नियोजन करण्यात आले आहे.लोक अदालतीत ठेवण्यात आलेल्या प्रकरणातील सर्वच ग्राहकांना नोटीस बजाऊन संबंधित तालूक्यातील लोक अदालतीमध्ये सहभागी होण्याबाबत माहिती देण्यात आली आहे.त्याचबरोबर प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी महावितरणकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्याबाबत विभाग आणि उपविभागीय कार्यालयांना निर्देशही देण्यात आले आहे.

# अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला

**दर्यापूर** - दिनांक 19 च्या सकाळी 7 वाजता चे सुमारास येवदा येथील स्मशानभूमीत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला. मृतदेह परिसरातील स्थानिक नागरिकांनी पाहिल्यावर पोलीस प्रशासनाला या बाबत माहिती दिली. घटनास्थळी पोलिसांनी दाखल होऊन मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणी करिता दर्यापूर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविला असून, मृत व्यक्तीच्या ओळखीचा शोध सुरू आहे. पोलीस निरीक्षक विवेक देशमुख यांनी सांगितले की, मृत व्यक्ती वयोमानाने अंदाजे 60- 65 वर्षेची असू शकते. स्मशानभूमीत मृतदेह सापडल्यामुळे ही घटना स्थनिकांच्या चर्चेचा विषय बनली.

# विना रायल्टी रेतीची वाहतूक

## युवा स्वाभिमानच्या जिल्हाध्यक्षाचे ट्रक पकडले ■ भाजप नेत्याच्या फोनला आयपीएस ठाणेदारांचा खो





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )** - मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात केली जात असलेली रेतीची वाहतूक ही विना रॉयल्टी होत असल्याचे पुन्हा एकदा उघडकीस आले. त्यामूळे महसूल विभाग, आरटीओ विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. अंजनगाव सुर्जी येथील आयपीएस ठाणेदार प्रशांत डगळे यांच्या पथकाने गेल्या आठवड्यात विना रायल्टी रेती वाहतूक करणारे ट्रक पकडले होते. हे ट्रक युवा स्वाभिमानच्या जिल्हाध्यक्षाचे असल्याचे समोर आले. हे ट्रक सोडण्याकरिता भाजपच्या एका महिला नेत्याचा ठाणेदारांना फोनसुध्दा आला, मात्र ठाणेदारांनी या फोनला खो देत यातील आरोपींवर गुन्हे दाखल केले. या दबंग कारवाईमूळे ठाणेदार डगळे यांचे अभिनंदन केले जात आहे.

मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात रेती वाहतूक केली जाते. या ट्रकांना महाराष्ट्रात प्रवेश करताना आरटीओ नाक्यावर महसूल विभागाचे व आरटीओचे प्रतिनिधी रॉयल्टी पास बनवून देतात. त्यानंतर हे ट्रक महाराष्ट्रात रेती वाहून नेतात. परंतू वास्तवात या नाक्यांवर अशी कुठलीच रॉयल्टी पास बनवून दिली जात नसल्याचे समोर आले आहे. अंजनगाव पोलिसांनी 14 मार्च 2025 रोजी केलेल्या कार्यवाहीमध्ये मो. अलताफ मो. सादीक, (वय 24 वर्ष, रा. शहापुरा, अंजनगाव सुर्जी), मो. सलीम अ. रशीद (वय 54 वर्ष रा. कांडली परतवाडा), आबाद



अली मो. शरीफ, (वय 38 वर्ष, रा. पॅराडाईस कॉलनी अमरावती), अजय सुरेशराव देशमुख (रा. चिचोंली), मोहम्मद साजीद मो. युसुफ (रा. परतवाडा) यांचे विरुध्द कलम 303(2) ब्ळ्हस सहकलम 21(4) खाण व खनिज अधिनियम 1957 अन्वये गुन्हा दाखल केला. अंजनगाव पोलीस 13 मार्च 2025 रोजी रात्री 12 वा. दरम्यान होळी बंदोबस्ताकरीत नवीन बस स्टँड ते विठ्ठल मंदीर परीसरात वाहतुक डयुटी करत असतांना बस स्टँड चौकात ट्रक क्र. एमएच 37/ टी 2772 व एमएच 27/ बी एक्स 9644 असे दोन ट्रक व विठ्ठल मंदीर येथे युपी 72 बीटी 8384 असा एक, असे एकुन तिन ट्रक रेतीची वाहतुक करतांना मिळुन आले. वरुन त्यांना पोलीसांनी थांबवुन रेती वाहतुक परवाना बाबत विचारपुस केली असता त्यांनी त्यांचेकडे कोणताही रेती वाहतुक परवाना नसल्याबाबत सांगितले. यावरुन हे ट्रक रेती चोरीची असल्याबाबत संशय आल्याने त्याबाबत ठाणेदार प्रशांत डगळे यांना फोनव्दारे माहीती देण्यात आली. त्यानंतर पुढील कारवाई करण्यात आली.

# मेळघाटाच्या गवळी समाजाचे दोन युवक बनले महसूल सहाय्यक

## एमपीएससी परीक्षेत मिळविले यश





**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.19 )** - शिक्षणासाठी कोणतेही सोयीस्कर वातावरण नसताना जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मेळघाटच्या गवळी समाजातील दोन युवकांनी एमपीएससीची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण करून दाखविली. या दोघांचीही महसूल सहाय्यक पदी प्रशासकीय सेवेत नियुक्ती करण्यात आली आहे.

धारणी तालुक्यातील टेंबली या गावातील माधव शिवकुमार पाटील व चिखलदरा तालुक्यातील दहेंद्र येथील रवींद्र येवले या विद्यार्थ्यांनी हे घवघवीत यश प्राप्त केले आहे. प्रशासकीय सेवेत दाखल होऊन या दोन्ही युवकांनी गवळी समाजाचा नावलौकिक वाढविणल्याची भावना समाज बांधवांनी व्यक्त केली आहे.

मेळघाटात गवळी समाज मोठ्या संख्येने वास्तव्यास आहे. राणावनात राहणारी गवळी समाजाची कुटुंबे पशुपालन करून आपला उदरनिर्वाह करतात. शैक्षणिक दृष्ट्या मागासलेपण असलेल्या या समाजात अलीकडच्या काळात तरुणांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता पाहायला मिळत आहे. मेळघाटात लोकसंख्येच्या बाबतीत दुसर्‍या क्रमांकावर असलेल्या गवळी समाजातील बोटावर मोजण्याइतके लोक शासकीय सेवेत आहेत. अशात शिक्षणासाठी कुठलेही वातावरण नसताना होतकर विद्यार्थी शिक्षण घेऊन जीवनात पुढे जाण्यासाठी धडपड करीत आहेत. माधव पाटील आणि रवींद्र येवले हे त्यापैकीच होत. दोघांच्याही घरची आर्थिक परिस्थिती बेताची असताना परिश्रम करून आई-वडिलांनी या मुलांना शिक्षण घेण्यासाठी पाठबळ दिले. जिल्ह्याच्या ठिकाणी पाठविले. या मुलांनीही आपल्या पालकांच्या कष्टाचे चीज करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केले व शासकीय सेवेत प्रवेश मिळविला. या दोन्ही युवकांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांना दिले आहे. दोघेही आपल्या समाजातील नवीन पिढीसाठी आदर्श ठरले आहेत.

# शिवजयंती निमित्त धारणीत निघाली बाईक रॅली

## शिवसेना उबाठा पक्षाचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.19 )** - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती धारणी येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त धारणी शहरातून भव्य बाईक रॅलीचे पक्षातर्फे आयोजन करण्यात आले होते. त्यात शिवसैनिकांसह शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. धारणी येथील भुतेश्वर महादेव मंदिरापासून या बाईक रॅलीला प्रारंभ झाला. तालुकाप्रमुख राजू राठोड यांच्या नेतृत्वात ही बाईक रॅली काढण्यात आली होती. संपूर्ण शहरातून मार्गक्रमण केल्यानंतर बाल हनुमान मंदिरानजीक या रॅलीची सांगता झाली. रॅली दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या नामघोषाचा जयजयकार करण्यात आला. %जय शिवाजी, जय भवानी%च्या गर्जनेने धारणी शहर दुमदुमून गेले होते. शिवसेना उबाठाच्या नेत्यांसह युवकांचा लक्षणीय सहभाग होता. रॅलीनंतर एक सभा पार पडली. त्यात शिवसेना नेते अनिल मालवीय, सुनील चौतमाल, उपजिल्हाप्रमुख शैलेंद्र मालवीय, दयाराम सोनी, तालुका प्रमुख राजू राठोड यांनी उपस्थितांना शिवजयंती निमित्त मार्गदर्शन केले.

शिवसेना उबाठा पक्षाचे धारणी तालुक्यात संघटन वाढविण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन कार्यकर्त्यांना करण्यात आले. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अनिल मालवीय, नगरपंचायतचे माजी उपाध्यक्ष सुनील चौथमल, उपजिल्हाप्रमुख शैलेंद्र मालवीय, दिनेश धनेवार, राजकुमार मोहोळ, अर्पण मालवीय, प्रतीक मालवीय, दयाराम सोनी आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# शिवजयंतीच्या शोभायात्रेत एकवटली तरुणाई

**महासागर प्रतिनिधी**

**वडनेर गंगाई,( दि.19 )**- दर्यापूर तालुक्यातील वडनेर गंगाई येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गावातील शेकडो तरुण उत्साहाने शोभायात्रेत सहभागी झाले होते. छत्रपती शिवरायांचा जयजयकार करीत एकवटलेल्या तरुणाईने त्यांना अभिवादन केले. या शोभायात्रेत आकोट येथील ओम महाराज यांनी तीन क्विंटल वजनाचे त्रिशूल उचलून ते फिरविले. ओम महाराजांचे हे सहासी कर्तब वडनेर गंगाई वासियांचे लक्ष वेधून घेणारे ठरले. संपूर्ण मिरवणुकीत त्रिशूल फिरवत भगवान महादेवाचा त्यांनी जयघोष केला. वारकरी दिंडी, ढोल-ताशा पथक यासह विविध महापुरुषांच्या वेशभूषा केलेले तरुण या शोभायात्रेत सहभागी झाले होते. ते या शोभायात्रेचे आकर्षण ठरलेत. गावातील बस स्टॅन्ड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून शोभायात्रेची सुरुवात झाली. झगेश्वर मंदिर, बाजारपुरा, संगम नवदुर्गा उत्सव मंडळ, दरबार पुरा, झेंडा चौक या मार्गाने पुन्हा शोभायात्रा बस स्टॅन्ड येथे पोहोचली व तेथे समारोप झाला. या भव्य दिव्य शोभायात्रेच्या यशस्वीतेसाठी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ॠषिकेश शेगोकार, उपाध्यक्ष कुलदीप हागे, सचिव कुलदीप ढेपे यांच्या नेतृत्वात गावातील नागरिकांनी परिश्रम घेतले. मिरवणूक शांततेत पार पाडण्याची जबाबदारी येवदा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक विवेक देशमुख व त्यांच्या सहकार्‍यांनी सांभाळली.

# दर्यापूर नगरपालिका क्षेत्रावर राहणार सीसीटीव्ही कॅमेर्‍यांची नजर

## नागरिक हक्क संरक्षण समितीच्या प्रयत्नांना यश

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.19 )** - दर्यापूर शहरवासीयांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नगरपालिका क्षेत्रातील संवेदनशील भागामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून त्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारला पाठविण्यात आला आहे, अशी माहिती नगर परिषदेचे मुख्य अधिकारी तथा प्रशासक नंदू परळकर यांनी दिली.

शहरवासीयांच्या सुरक्षेसाठी तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून दर्यापूर शहरात विविध भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी स्थानिक नागरिक हक्क संरक्षण समितीतर्फ नगर परिषदेकडे करण्यात आली होती. समितीतर्फे त्याचा सातत्याने पाठपुरावाही करण्यात आला. या मागणीचीच दखल घेऊन नगरपरिषदेने शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असल्याचे मुख्याधिकार्‍यांनी सांगितले. शहरात



वाहतुकीचाही प्रश्न निर्माण झाला असून, तो सोडविण्यासाठी महत्त्वाच्या चौकांमध्ये ट्राफिक सिग्नल बसविण्याचा प्रस्तावही नगरपरिषदेच्या विचाराधीन असल्याची माहिती मुख्याधिकारी नंदू परळकर यांनी दिली. नागरिक हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष अ‍ॅड.संतोष कोल्हे आणि सचिव शरद रोहनकर यांनी नुकतीच मुख्याधिकार्‍यांची भेट घेतली. त्यावेळी यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

# विदर्भातील काही जिल्ह्यांत पावसाचे संकेत

## तापमानात घसरणार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 19 )** - वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे देशभरातील अनेक राज्यांच्या हवामानावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम विदर्भातही होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रने व्यक्त केली आहे. त्यानुसार येत्या काही दिवसांत पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. तर पश्चिम विदर्भात तापमानात मोठी घट होण्याची शक्यता आहे.



20 ते 22 मार्च दरम्यान पूर्व विदर्भातील नागपूर विभागातील काही जिल्ह्यांमध्ये विविध ठिकाणी विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. तर पश्चिम विदर्भातील अमरावती विभागातील केवळ यवतमाळ जिल्ह्यात या काळात पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. या बदलत्या हवामानामुळे तापमानात 3 ते 5 अंशांनी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मार्च महिन्यातील कडक उन्हापासून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# महापालिकेकडून मालमत्ता करात 50 टक्के सूट

## नागरिकांना शेवटची संधी

## लाभ घेण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )**- सन 2024-2025 या चालू आर्थिक वर्षात अमरावती महानगरपालिकेकडून मालमत्ता कराच्या दरात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. जे मालमत्ताधारक चालू वर्षाचा 20 मार्च 2025 पर्यंत मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना सामान्य करात 50 टक्के सूट लागू राहील, असे महानगरपालिकेकडून जाहीर करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रातील मालमत्ताधारकांसाठी ही शेवटची संधी असून त्यांनी या संधीचा लाभ घेउन तात्काळ आपल्या मालमत्ता कराचा भरणा करावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.



अमरावती महानगर पालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने विविध सुट योजना देऊनही अनेक थकबाकीदार मालमत्ताधारक कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांच्यावर महापालिके मार्फत धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत आहे.

त्यानुसार मनपा क्षेत्रात मालमत्ता कराच्या वसूलीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या वसूली पथकामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. तरी व्याज, शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा करावा व जप्तीसारखी कटू कार्यवाही टाळावी, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

# विद्यार्थी अचानक घरातून बेपत्ता

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )** - मच्छीसाथ परिसरातील मंथन व्यास हा विद्यार्थी सोमवारपासून घरातून (दि.18) बेपत्ता झाला आहे. याबाबत कुटुंबीयांनी पोलिसांनाही माहिती दिल्याचे वृत्त आहे. मंथन व्यास बेपत्ता झाल्याने परिसरात खळबळ उडाली असून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यास कुटुंबीयांकडून मंथनबाबत काही माहिती असल्यास कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मुकेश व्यास यांचा मुलगा मंथन हा शहरातील एका महाविद्यायात अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षाला शिकत आहे. कॉलेज व्यवस्थापनाशी काही मुद्द्यावरून वाद झाल्यानंतर मंथन घरी परतल्याचेही सांगण्यात आले. मंथन घरी परतल्यावर त्याने मोबाईल हँडसेट आणि इतर मौल्यवान वस्तू ठेवल्या. त्यानंतर काहीतरी मोठे बनून दाखवेन असे घरातील लोकांना सांगून तो निघून गेला. रात्री उशिरापर्यंत कुटुंबीय त्याच्या येण्याची वाट पाहत होते. मात्र तो परत न आल्याने सोशल मीडियावर फोटोसह त्याच्या बेपत्ता झाल्याची माहिती देण्यात आली.तसेच पोलिसांतही तक्रार देण्यात आली.

# आधार प्रमाणीकरणासाठी वृद्धांची हेळसांड

## योजनांच्या अनूदानापासून वंचित ■ तहसिलमध्ये नियोजनाचा अभाव



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.19 )** - येथील तहसील कार्यालयात संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ अनुदान योजनेच्या वृद्ध लाभार्थ्यांनी आधार लिंक न केल्याने गेल्या दोन महिन्यांपासून त्यांचे अनुदान बंद आहे. त्यामुळे या वृद्धांना वैशाखाच्या जिवघेण्या उन्हात तहसील कचेरीला आधार लिंक करण्यासाठी खेड्यापाड्यातून यावे लागते. या वृद्धांसाठी तहसिल कार्यालयात कोणत्याच प्रकारची विशेष व्यवस्था नसून नियोजनाचा पूर्णतः अभाव आहे. परिणामी येथे वृद्धांची मोठी हेळसांड होत आहे. तालुक्यातील हजारो लाभार्थी या कारभारामुळे हवालदिल झालेले आहे.

विशेष म्हणजे आधार लिंकसाठी आलेले बहुतांश लाभार्थी जेष्ठ नागरिक तसेच अपंग वर्गातील आहेत. पण सुस्त प्रशासनाला त्यांचे काही सोयरेसुतक नाही. सकाळपासुन कार्यालयात आलेले लाभार्थी दिवसभर उन्हात ताटकळत बसतात. शेवटी पाच पन्नास लोकांची आधार लिंक झाल्यावर साईट बंद पडल्याची घोषणा करुन संबंधित कर्मचारी लाभार्थी लोकांना परत घरी पाठवितात. आता तर चार दिवस साईट बंद राहणार असल्याचे तहसिल प्रशासनाने नोटीस लाऊन जाहीरच करुन टाकले आहे. तालुक्यातील हजारो लाभार्थी यांचे आधार लिंक करण्यासाठी केवळ दोनच कर्मचारी हा विभाग सांभाळत असल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत. शासनाच्या परीपत्रकानुसार जेष्ठ नागरिकांना द्यावयाच्या सोयी सवलतींची येथील प्रशासनाला जाणीव नाही, हा चिंतेचा विषय ठरत आहे.

खेड्यापाड्यातून उपाशी-तापाशी येणार्या वयोवृद्ध लाभार्थ्यांना धड बसायला पण जागा नाही. ह्या अडचणी तहसील प्रशासनाने त्वरित सोडवाव्यात अशी मागणी लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

# शिवाजी शाळेच्या एनसीसी कॅडेट्सची महेंद्री वन परिसरात सहल

## वन विभागाच्या सहकार्याने उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.19 )** - स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळा आणि वन विभाग मोर्शी यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या एनसीसी कॅसेट्ससाठी महेंद्री वन परिसर, पुसला फॉरेस्ट डेपो आणि महेंद्र ?ग्रो टुरिझम येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना विविध वृक्ष प्रजातींची ओळख करून देणे, त्यांना प्राण्यांची माहिती देणे तसेच वनविभागाच्या उपक्रमांबाबत त्यांना अवगत करुन देणे हा होता. वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल चौधरी यांच्या पुढाकाराने ही सहल आयोजित करण्यात आली होती. यादरम्यान सहायक वनपरिक्षेत्र अधिकारी भुजाडे यांनी विद्यार्थ्यांना औषधी वनस्पती व विविध वन्य प्राण्यासंबंधात सविस्तर माहिती दिली. जलसंवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले.

ही शैक्षणिक सहल शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडली. उपक्रमाच्या आयोजनामध्ये ज्येष्ठ शिक्षक विजय तारापुरे, एनसीसी ऑफिसर पवन भागवत, विशाखा ठाकरे, वैशाली देशमुख, अभिजीत देशमुख, प्रतीक उगले यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांचे सहकार्य लाभले.

# भक्तिमार्ग



## प्रवास महामानव बनण्याचा

भक्ती आणि बोध

**भा**रतीय संस्कृती उदात्त आणि सर्वसमावेशक मानली जाते. म्हणूनच ऋषीमुनींनी 'वसुधैव कुटुंबकम' ही शिकवण दिली आहे. अवघी पृथ्वी हे आपलं कुटुंब आहे. सगळ्यांशी प्रेमाने वागा, असा त्याचा अर्थ आहे. या शिकवणीकडे आपण बारकाईने पाहत नाही. याकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहिलं तर लक्षात येतं की तन आणि मन संतुलित करण्याचा मार्गही या विचारामुळे सूकर होतो. यामुळे माणूस आदर्श वर्तन करू शकतो. या वाक्याचा खोलात जाऊन विचार केला तर बरंच काही लक्षात येऊ शकतं. प्रत्येकाला सामावून घ्यायला हवं, अशी शिकवण आपल्याला 'वसुधैव कुटुंबकम' या संज्ञेमधून मिळते. 'वसुधैव कुटुंबकम'मधून सांगितलेला मूळ भाव जाणून घेतला तर आपण मानवच नाही तर महामानवही बनू शकतो.

माणसाचं शरीर सर्वात मौल्यवान मानलं जातं. सुख असो वा दु:ख, हे शरीर सगळं काही भोगत असतं. सुख-दु:ख, वेदना, विकार, जन्म-मरण हे सगळं शरीर भोगत असतं. प्राणवायूला गीतेत अजर आणि अमर म्हटलंय. शरीराने होणारं एखादं कार्य मनाच्या परवानगीशिवाय पूर्ण होत नाही. आपल्या मनाची सगळी कार्यं ज्ञानेद्रियांच्या आदेशाने होत असतात. माणूस विवेकाने वागला आणि सगळ्या इंद्रियांना एकाच कुटुंबाचे सदस्य मानून ताळमेळ साधण्याचा प्रयत्न केला तर अनेक गोष्टी सुकर होऊ शकतात. असा ताळमेळ साधता आला तर शरीररूपी वसुधेत कोणतेही विकार उत्पन्न होणार नाहीत. मनात एक, डोक्यात एक असं असेल तर शरीरात विकारांचा वास होऊ लागतो. शरीर मन आणि डोकं यांच्या द्वंद्वात अडकून पडतं. यामुळे ताणतणाव निर्माण होतात. विविध अवयवांवर वाईट परिणाम होऊ लागतात. त्यामुळे लहानसहान बाबींसाठी शरीराला त्रास देणं योग्य ठरत नाही. आज जगभरातले अनेक देश भौतिकवादाचा त्याग करून भारतीय जीवनशैलीचा, अध्यात्माचा योगाचा अंगिकार करत आहेत पण आपण इतरांचं अंधानुकरण करत आहोत. शरीराचा त्रास टाळायचा असेल तर अध्यात्मिक मार्गाने चाला. भोगवाद टाळा आणि ज्ञानेंद्रियांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करा. यामुळे शरीराचे त्रास कमी होऊ शकतील आणि आपण महामानव बनण्याच्या दिशेने मार्गक्रमण करू.

## फाल्गुनातील वसंतसोहळा

**वर्षातला सर्वात शेवटचा म्हणजे बारावा महिना असलेला फाल्गुन अवतरला आहे. बदलत्या ऋतूपर्वात येणाऱ्या या महिन्याला 'वसंताचा महिना' म्हणूनही ओळखलं जातं, कारण या महिन्यात वसंत अगदी भरात असतो. एकीकडे थंडी परतलेली असते तर दुसरीकडे उन्हाळ्याचं प्रथम चरण असल्याने म्हणावी तशी तलखी जाणवू लागलेली नसते. हा महिना सृष्टीसौंदर्याचा अनुपम सोहळा मांडतो तसंच धार्मिक कृत्यांद्वारे अनोखं पावित्र्यही देतो.**



भक्ती विशेष

**का**लचक्र आपल्या गतीने फिरत असतं. त्यात बारा मास आणि सहा ऋतूंचे सोहळे साजरे करताना दिवस कसे जातात हे समजतही नाही. दर वर्षी आपण तेच सण साजरे करतो, पण प्रत्येक वेळी उत्साह, चैतन्य यात तसूभरही अंतर पडलेलं दिसत नाही. याचं महत्त्व कारण म्हणजे आपणही या कालचक्राचाच एक भाग होऊन फिरत असतो. या चक्राचा एक छोटा आरा आपणही असतो. त्यामुळे बदलत्या महिन्यांचे, ऋतूंचे, सणावारांचे पडसाद आपल्या आयुष्यावर पडत असतात. प्रत्येक पिढी या बदलाचा कालसुसंगत अर्थ लावण्यात गर्क असते. या सणांमध्ये जीवनाचं आणि जीवनशैलीचं प्रतिबिंब पाहणं हा आपला लाडका छंद असतो. विविध कलांना, महोत्सवांना, उत्सवपर्वांना बरोबर घेऊन भ्रंमती करत असणारा हा महिन्यांचा काफिला दर वेळी आपल्याला सामोरा येतो आणि आपणही नेहमीच्याच उत्साहाने त्याला सामोरं जातो. आता असंच एक वर्ष आपला निरोप घेण्यास आणि एक नवीन वर्ष आपल्यासमोर येण्यास सज्ज आहे. वर्षातला सर्वात शेवटचा म्हणजे बारावा महिना फाल्गुन अवतरला आहे. बदलत्या ऋतूपर्वात येणाऱ्या या महिन्याला 'वसंताचा महिना' म्हणूनही ओळखलं जातं, कारण या महिन्यात वसंत अगदी भरात असतो. एकीकडे थंडी परतलेली असते तर दुसरीकडे उन्हाळ्याचं प्रथम चरण असल्याने म्हणावी तशी तलखी जाणवू लागलेली नसते. म्हणूनच स्थित्यंतराचं हे पर्व एका आल्हाददायक वातावरणाची अनुभूती देऊन जातं. हा महिना सृष्टीसौंदर्याचा अनुपम सोहळा मांडतो तसंच धार्मिक कृत्यांद्वारे अनोखं पावित्र्यही देतो.

व्रतवैकल्यांच्या दृष्टीने फाल्गुन मास महत्त्वाचा मानला गेला आहे. या महिन्यात भारताच्या विविध भागांमध्ये वेगवेगळे महोत्सव आयोजित होतात. छोट्या-मोठ्या देवळा-राऊळांमध्ये फाल्गुन मासानिमित्त खास पूजा-अर्चना संपन्न होतात. या महिन्यात बरेच सण साजरे होत असले तरी सर्वात लक्षवेधी ठरते ती होळीपौर्णिमा. भारतात हा दिवस धूमधडाक्यात साजरा केला जातोच त्याचबरोबर अन्य दिवसही महत्त्वाचे मानले जातात. फाल्गुन शुक्ल अष्टमी हा असाच एक दिवस. या दिवशी लक्ष्मीची अर्थात सीतेची पूजा केली जाते. फाल्गुनी पौर्णिमेला फाल्गुन नक्षत्र असेल तर हा दिवस विशेष शुभ मानला जातो. या दिवशी भाविक पलंग अथवा बिछाना दान देतात. यामुळे सुभार्याची प्राप्ती होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. या दानकार्यामुळे सौभाग्याची प्राप्ती होते असाही विश्वास आहे. दक्षिण भारतात फाल्गुनी पौर्णिमेच्या दिवशी 'उत्तिर' नामक एका महोत्सवाचं आयोजन होतं. हा मंदिरोत्सव हे या महिन्यातील प्रमुख आकर्षण असतं. फाल्गुन मासात द्वादशीला श्रवण नक्षत्र असलं तर या तिथीला फाल्गुन श्रवण द्वादशी असं म्हणतात. या दिवशी उपवास केला जातो. दानधर्म करून हा दिवस साजरा करतात.

हा सगळा काळ वसंतोत्सवाने भारलेला असल्यामुळे रम्य भासतो. सगळीकडे पाना-फुलांचा मोहोर लगडलेला असतो. उत्सव केवळ आनंदासाठी नसून त्यामागे दृष्टीकोन आणि शास्त्रीय बैठक असते. म्हणून या महिन्याला नवोन्मेषाचा महिना म्हणून संबोधलं जातं. या काळात सृष्टी कात टाकून नव्या नव्हाळीने आपले रूप, रंग बदलत असते. एक सुरेल ताजेपणा चराचरात भरून राहिलेला असतो. संपत आलेली थंडी आणि सुरू होणारा वैशाख वणवा याच्या धुसरशा सीमारेषेवर वातावरण रम्य बनतं. त्यात होळी आणि रंगपंचमी हे उत्सव निर्मळतेने आणि विविध रंगांना स्वच्छ अंत:करणाने सामावून घेणारे ठरतात. 'जुने जाऊ दे मरणालागून'सारख्या नाविन्याच्या ध्यास घेणाऱ्या वृत्तीला होळीच्या उत्सवाने चालना मिळते आणि त्यानंतर प्रकटणाऱ्या रंगपंचमीने नवनिर्मितीला रंगीत-संगीत केलं जातं. ही रंगपंचमी किंवा होळी हे मानवाच्या विचारांचे द्योतक आहेत. चांगलं ते घ्यावं, इतरांना वाटावं आणि वाईट ते संपवून टाकावं असा संदेश देणारे हे उत्सव साहजिकच मानवी संस्कृतीच्या इतिहासातले महत्त्वाचे टप्पे म्हणावे लागतील. निसर्ग, त्यात असणारा मानव आणि त्याचे सर्वांशी असणारं सहचर्य यातून उलगडत जाणारं भावविश्व या उत्सवातून लोककला संगीताच्या माध्यमातून उलगडत जातं.

आपल्या बाराही महिन्यातले सणवार त्या त्या ऋतुमानाशी, पर्यावरणाची सांगड घालून साजरे केले जातात. शास्त्र आणि रुढी यांचा मनोहर संगम इथं साधलेला दिसतो. दानधर्माचासुद्धा तसाच समन्वय साधलेला आहे. फाल्गुन महिन्यातल्या सणांची वैशिष्ट्यं पाहिली तर मानवी मनाचा किती सुक्ष्म विचार केलेला आहे याची प्रशंसा करावीशी वाटते. फाल्गुन मासातले सणवार साजरे करताना भारतभर वैविध्य जाणवेल, त्याच्या स्वरूपात थोडा फार फरक आढळेल पण मूळ सूत्र तेच आहे. या महिन्यात विष्णूला संतुष्ट करण्यासाठी तांदूळ, गाय, कृष्णाजिन, वस्त्र यांचे दान देण्याची प्रथा आहे. स्कंध पुराणात पुरुषांनी या कालात एकभुक्त रहावं असं सांगितलं आहे. असे पुरूष स्त्रियांना प्रिय होतात असंही म्हटलं आहे. आधी वर्णन केल्याप्रमाणे पौर्णिमेला फाल्गुनी नक्षत्र असताना चंद्रोदय झाल्यावर रात्र गायन, नर्तन, वादन यात घालवावी. पौर्णिमेला फाल्गुनीयाग करण्याची प्रथाही प्राचीन काळात होती. मानवगृह्यसूत्रात या यागाचे विधान सांगितले आहे. भग आणि अर्यमा देवतांना लाह्यांच्या, अपूपाच्या आहुत्या द्याव्यात. यज्ञयाग, होम, तिळातांदुळाच्या आहुत्या आदी विधी प्राचीन शास्त्रात सांगितले आहेत.

फाल्गुन महिना लक्षात राहतो तो मुख्यत्वे होळीमुळे. होळी, हुताशनी महोत्सव, शिमगा इत्यादी त्याची नावं आहेत. होळीमधला मूळ शब्द आहे 'सुग्रीष्मक'. फाल्गुन पौर्णिमेपासून पंचमीपर्यंत हा होळीचा उत्सव चालतो. काही ठिकाणी नवमीपासूनच सुरवात होते. हा वसंताच्या आगमनाचा आनंद साजरा करण्याचा उत्सव आहे. वसंताआगमनोत्सवच म्हणा ना ! पौर्णिमेला सर्वत्र होळी पेटवण्याची पद्धत आहे. लहान मुलांना पीडा देणाऱ्या होलिका, होलाका, ढूंढा, पुतना या राक्षसींना अग्नी पेटवून पळवून लावण्याचा हेतू त्यामागे आहे. प्राचीन अग्नीपूजक पूर्वजांच्या परंपरेचा हा अवशिष्ट भाग आहे समजण्यास हरकत नाही.

या महिन्यात बंगालमध्ये 'दोलायात्रा' असते. फल्गु म्हणजे गुलाल, तो कृष्णमूर्तीवर उधळून होळी खेळतात. उत्तर प्रदेशमध्ये लाल, पिवळी वस्त्रं परिधान करून टिपऱ्या खेळतात. महाराष्ट्रात आंबा, केळी, माड, पोफळ, एरंड यांची होळी उभारतात. गोव्यामध्ये होळी केवळ उभी करतात. जाळत नाहीत. ग्रामदेवतेच्या देवळासमोर ती उभी रहाते. उभा वृक्ष हेरून, त्याची यथोचित पूजा करून, त्याच्या फांद्या तोडून तो वाजत-गाजत खांद्यावरून मिरवत गावात आणला जातो. त्याला आंब्याच्या पानांनी सजवतात. टोकावर असोला नारळ बांधतात. कागदी झेंडे लावतात. या महिन्यात महाराष्ट्रात लोक कॉफी, भांग, मद्य, अफू यांचे सेवन करतात. गंजिफा, पत्ते, सोंगट्या यांचे खेळ करतात. गाणी म्हणतात. अनेक प्रकारची सोंगं काढली जातात. गोमूचे नाच होतात. देवाची निशाणे वाजतगाजत घरोघर जातात. राधाकृष्णाचे नाच काढतात, खेळ्ये खेळतात, एकूणच हा नवनिर्मितीचं दिलखुलास स्वागत करण्याचे संकेत देणारा महिना आहे. माणसांच्या मनात असलेल्या सर्व क्षुद्र भावनांना जाळून टाकून रंगाची उधळण करत नवजीवनाचं स्वागत करण्यासाठी सज्ज होण्याचा संदेश आपल्याला फाल्गुन मास देतो ! तेव्हा आपण या मासाचा मनमुराद आनंद लुटू या. पुरणपोळीने आणि नाचगाण्यांनी त्याचे स्वागत करू या. घराबाहेर पडून सृष्टीचं नव्यानव्हाळीचं रूप अनुभवू या.

## घर बांधताना

वास्तू भक्ती

**स्व**त:च्या हक्काचं घर हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. आपल्या घरात शांतता नांदावी, ती वास्तू सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन यावी, असंही वाटत असतं. यासाठी घरातल्या माणसांसोबतच वास्तूशास्त्राचं योगदान महत्त्वाचं मानलं जातं. घर बांधताना फेंगशुई शास्त्राची मदत घेतली तर अनेक गोष्टी सूकर होऊ शकतात, असं मानलं जातं. म्हणूनच घर घेताना किंवा बांधताना कोणती खोली कुठे असावी, याबाबतचं हे मार्गदर्शन...

✻ नव्याने लग्न झालेल्या जोडप्याने घर घेतल्यास शयनकक्ष उत्तर-पश्चिम दिशेला असेल असं बघावं. आयुष्यात महत्त्वाकांक्षा असलेल्या जोडप्यांचा शयनकक्ष दक्षिणेकडे असावा तर काही उद्देश्य साध्य करायची असतील तर शयनकक्ष उत्तरेकडे असावा. विवाहाला बरीच वर्षं झाली असतील तर शयनकक्ष पूर्वेकडे असावा. यामुळे दांपत्य सुखी आणि समाधानी आयुष्य जगू शकेल. पाहुण्यांची खोली उत्तर-पश्चिम दिशेला असावी. झोपताना डोकं दक्षिणकडे करा. दक्षिणेकडे डोकं करून झोपणं शक्य नसेल तर पूर्वेकडे डोकं करून झोपा.



✻ स्वयंपाकघर दक्षिण-पूर्व दिशेला असू द्या. दक्षिण-पूर्व हा अग्नीचा कोपरा मानला जातो. या दिशेला स्वयंपाकघर करणं शक्य नसेल तर उत्तर-पश्चिम, पश्चिम किंवा दक्षिण दिशेला प्राधान्य द्या. दक्षिण-पश्चिम दिशेला स्वयंपाकघर असू नये. यामुळे नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. स्वयंपाकघरात सिंक उत्तरेकडे तर फ्रिज उत्तर-पश्चिम दिशेला असावा. मोठी भांडी आणि इतर सामान दक्षिण-पश्चिम दिशेला ठेवावं.

✻ स्नानगृह पूर्व किंवा उत्तर दिशेला असलं पाहिजे. या दिशेला स्वच्छतागृह असू नये. स्वच्छतागृह उत्तर, उत्तर-पश्चिम किंवा पश्चिमेकडे असावं.

✻ उत्तर-पूर्व ही दिशा मानसिक समाधान आणि शांतता देते. या दिशेकडचा कोपरा कायम स्वच्छ असला पाहिजे. या कोपऱ्यात देवघर ठेवता येईल. इथे ध्यानधारणा, योगासनं करता येतील.

## चमत्कारी पातालेश्वर

तीर्थक्षेत्र

**भ**गवान शिवशंकराला भोळा सांब असं म्हटलं जातं. ही देवता भक्ताच्या एका हाकेला धावून जाते पण प्रसंगी तांडवनृत्यही करते. भगवान शंकराची अनेक मंदिरं आहेत. प्रत्येक मंदिराचं अनोखं वैशिष्ट्य आहे. बारा ज्योतिर्लिंगांचं महत्त्व तर आपण जाणतोच. भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करणारा असा शिवाचा लौकिक आहे. म्हणूनच भक्तमंडळी शिवाची मनोभावे आराधना करतात. उत्तर प्रदेशमध्ये मुरादाबाद आणि आग्रा या दोन शहरांना जोडणाऱ्या महामार्गाच्या मध्यावर सदत्बदी हे गाव आहे. या गावात पातालेश्वर मंदिर वसलंय. या मंदिरात झाडू अर्पण केला तर त्वचारोग दूर होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे.



पातालेश्वर हे शिवाचं प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात भक्तांची गर्दी झाल्याचं पहायला मिळतं. त्वचारोगांचा सामना करणारे अनेक भक्त इथे श्रद्धेने येतात आणि शिवाला झाडू अर्पण करतात. यामुळे त्यांना रोगापासून मुक्ती मिळते. भक्तमंडळी समाधानाने आपल्या घरी परत जातात. पातालेश्वर मंदिरासंबंधी एक दंतकथा सांगितली जाते. ती अशी की, भिकारीदास नावाचा एक श्रीमंत व्यापारी होता. त्याला त्वचारोगांनी ग्रासलं होतं. रोगावर उपचार घेण्यासाठी गावातल्या एका प्रसिद्ध वैद्याकडे तो निघाला. वाटेत त्याला तहान लागली. तहानेने व्याकूळ झालेल्या व्यापाऱ्याला एक आश्रम दिसला. तो आश्रमात गेला. इथे ठेवलेल्या झाडूला त्याचा धक्का लागला. झाडूच्या स्पर्शाने व्यापाऱ्याचा त्वचारोग दूर झाला. व्यापाऱ्याच्या दृष्टीने हा मोठा चमत्कार होता. रोगमुक्त झाल्याने व्यापाऱ्याला खूप आनंद झाला. आश्रमातल्या साधूला त्याने पैसे देऊ केले पण साधूने ते नाकारले. या स्थानी मंदिर बांधावं, अशी त्याची इच्छा होती. काही दिवसांनी व्यापाऱ्याने शिवमंदिर बांधलं. या ठिकाणी झाडू अर्पण केल्याने त्वचारोग दूर होतात, अशी श्रद्धा यामुळे दृढ झाली आहे.

## हे आहेत अवतार

**महाभारत हा अत्यंत प्राचीन असा ग्रंथ मानला जातो. वेद व्यासांनी लिहिलेलं हे महाकाव्य रहस्यमय मानलं जातं. कौरव आणि पांडवांचं युद्ध, द्रौपदी वस्त्रहरण अशा अनेक घटनांमुळे महाभारत गाजलं. महाभारतातलं प्रत्येक पात्र कुणा ना कुणाचा अवतार असल्याचं मानलं जातं. काही पात्रं देवतांचा अवतार होती तर काही गंधर्वांचा. साक्षात श्रीविष्णूनेही श्रीकृष्णाचा अवतार घेऊन महाभारतात महत्त्वाची भूमिका वठवली. महाभारतातलं कोणतंही पात्र सामान्य नव्हतं. महाभारताच्या आदिपर्वात याबाबचा उल्लेख आढळतो. याविषयीची माहिती रंजक आहे.**

जाणून घ्या

६४ कला आणि अष्टसिद्धींचा अधिपती असलेला श्रीकृष्ण भगवान विष्णूचा अवतार मानला जातो. श्रीकृष्ण मागच्या जन्मी मनू होता, असं मानलं जातं.

✻ बलराम शेषनागाचा अवतार असल्याचं मानलं जातं. बलवान असल्याने त्याला बलभद्र या नावानेही ओळखलं जातं. महाभारताच्या युद्धादरम्यान बलरामाने तटस्थ रहायचं ठरवलं होतं.

✻ द्यु नावाच्या वसूने भीष्माच्या रूपात जन्म घेतला होता. श्रीकृष्णानंतर भीष्म हे महाभारतातलं महत्त्वाचं पात्र मानलं जातं. भीष्माला देवव्रत असंही म्हटलं जातं. वशिष्ठ ऋषींनी दिलेला शाप आणि इंद्राच्या आज्ञेमुळे आठही वसूंची उत्पत्ती शांतनू आणि गंगेपासून झाली. सात वसूंना गंगेतच बुडवण्यात आलं. पण आठवा वसू द्यु जिवंत राहिला. त्याने भीष्मरूपात जन्म घेतला.

✻ अश्वत्थामा हा गुरू द्रोणाचार्यांचा पुत्र. महादेव, यम, काल आणि क्रोध यांच्या एकत्रीकरणातून तयार झालेल्या अंशातून अश्वत्थाम्याचा जन्म झाला होता.

✻ कर्ण सूर्याचा पुत्र होता. कर्णाला सूर्याचा अंश मानलं जातं. कर्ण कुंती आणि सूर्य यांचा पुत्र होता.

✻ दुर्योधन कलियुगाचा अवतार मानला जातो तर इतर कौरव पुलत्स्य वंशाच्या राक्षसाचे अंश मानले जातात.

✻ अर्जुनाला पांडूचा मुलगा मानलं जात असलं तरी तो कुंती आणि इंद्र यांचा पुत्र होता. त्यामुळे इंद्राने कपट करून कर्णाची कवच कुंडलं काढून घेतली होती.

✻ भीम पवनपुत्र होता. हनुमानही पवनपुत्र होता. भीमात १० हजार हत्तींचं बळ असल्याचं मानलं जातं.

✻ युधिष्ठिर हा धर्मराज आणि कुंतीचा पुत्र होता. पाच पांडवांमधला तो ज्येष्ठ भाऊ होता. द्रौपदीसोबतच देविका नावाच्या स्त्रीशी त्याने लग्न केलं होतं.

✻ नकुल आणि सहदेव यांनी दोन अश्विनीकुमारांच्या अंशातून जन्म घेतला होता. नासत्य आणि दस्त्र अशी त्यांची नावं होती.

✻ शकुनी द्वापारयुगातल्या एका अंशातून जन्मला होता.

✻ हंस नावाच्या गंधर्वाने धृतराष्ट्र आणि पांडूच्या रूपात जन्म घेतला.

✻ सिद्धी आणि धृतिका यांनी कुंती व माद्री यांच्या रूपात जन्म घेतला.

✻ मतीने गांधारीच्या रूपात जन्म घेतला होता.

✻ इंद्राणीने द्रौपदीच्या रूपात जन्म घेतला होता.



## काय करू नये?

धर्मग्रंथातून...

**रा**मायण हे आदर्श महाकाव्य मानलं जातं. श्रीराम हा मर्यादापुरूषोत्तम आणि आदर्श राजा होता. सीता त्याची कर्तव्यदक्ष पत्नी. लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांनी भावांचं कर्तव्य पार पाडलं. रामायणातली पात्रं आदर्श मानली जातात. आजच्या काळातही त्यांचं अनुकरण करण्याचे सल्ले दिले जातात. रामायणात खलनायकी पात्रंही होती. रावण हा मुख्य खलनायक. चरित्र, मर्यादा यांचा विचार केला तर रामायण सर्वश्रेष्ठ मानलं जातं पण रामायणातली प्रत्येक घटना आजच्या काळात लागू होईलच असं नाही. रामायणाचा काळ त्रेतायुगातला. या घटना त्या काळातही अनैतिकच मानल्या गेल्या. उदाहरण द्यायचं झालं तर कैकयीने सावत्र मुलगा रामाला वनवासात धाडलं. अयोध्येचं राज्य भरताला मिळावं यासाठी ती हट्ट धरून बसली. दशरथ राजाने तिला दिलेल्या वचनाचा गैरवापर केला. पण आईने आपल्या मुलांमध्ये कधीही भेदभाव करू नये. यामुळे कुटुंबात दुरावा निर्माण होतो.



बाली हा सुग्रीवाचा मोठा भाऊ. सुग्रीवाने रामाची साथ दिली. बालीने आपल्या मोठ्या भावाच्या पत्नीचं अपहरण करून राणी बनवायचा विचार केला पण अखेरीस बालीचा अंत झाला. श्रीरामाने बालीचा संहार केला. कुकर्मांमुळे त्याला ही शिक्षा मिळाली. वाईट मार्ग आचरू नये, हे या घटनेतून शिकता येईल. भावाची पत्नी किंवा कोणत्याही परस्त्रीवर वाईट नजर ठेऊ नये. परस्त्री मातेसमान मानली जाते. त्यामुळे तिच्याकडे त्याच नजरेने पाहिलं पाहिजे. परस्त्रीवर वाईट नजर टाकणं अनैतिक मानलं जातं. त्याची शिक्षा मिळते. नैतिक आणि चारित्र्याच्या अध:पतनामुळे परस्त्रीवर वाईट नजर टाकली जाते. त्यामुळे आजच्या काळातही परस्त्रीवर वाईट नजर टाकू नये. मुद्दे बाळबोध असले तरी बोलके आणि सदासर्वकाळ मार्गदर्शक ठरणारे आहेत.

## मोक्ष मिळवण्यासाठी

करा स्वमदत

**श्री**मद्भगवत गीता हा हिंदूधर्मीयांचा धर्मग्रंथ. कुरूक्षेत्रावर लढाई करत असताना श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतोपदेश केला. गीतेतला उपदेश आजच्या जगातही लागू पडतो. आजही आपण या मार्गाने चालू शकतो. यातील एका श्लोकानुसार ही चार कामं करणाऱ्या मनुष्याला स्वर्गप्राप्ती होते. अशा माणसाची सगळी पापं नष्ट होऊन त्याला मोक्ष मिळतो. नरकयातना टळतात, असं सांगण्यात आलंय. म्हणूनच माणसाने ही चार कामं केली पाहिजे. याविषयी जाणून घेऊ...

✻ दानेन तपसा चैव, सत्येन च दमेन च। ये धर्ममुवर्तन्ते ते नरा: स्वर्गामिन:।। हा गीतेतला श्लोक आहे.

✻ गरजूंना दान द्यावं. दानामुळे आपलं पुण्य वाढतं. आपलं दान गुप्त असावं. याची वाच्यता किंवा गवगवा करू नये. उजव्या हाताने केलेल्या दानाबद्दल डाव्या हातालाही कळता कामा नये असं आपली संस्कृती सांगते. सत्पात्री दानामुळे सगळ्या पापांचा नाश होतो.

✻ मन नियंत्रणात ठेवणं गरजेचं आहे. आयुष्यात महत्त्वाकांक्षा असावी पण यामुळे मनाचं संतुलन ढासळायला नको. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊ शकतो. त्यामुळे मनावर नियंत्रण ठेवणं सर्वाधिक गरजेचं आहे.

✻ कायम सत्याचा मार्ग अवलंबायला हवा. खोटं कधीही बोलू नये. सत्याचा मार्ग कितीही कठिण असला तरी तो आपल्याला ध्येय गाठण्यास मदत करतो. असत्य वागणारी आणि असत्याची कास धरणारी व्यक्ती पापाची धनी बनते. त्यामुळे कायम खरं बोललं पाहिजे.

✻ परमेश्वराची आराधना करणं गरजेचं आहे. देवाची आराधना करणाऱ्या व्यक्तीवर देवदेवता लोभ ठेवतात. दिवसातला काही काळ देवाच्या आराधनेसाठी दिल्याने सगळ्या समस्या दूर होतात. समस्येतून बाहेर पडण्याचा मार्ग मिळतो आणि यशही मिळतं. नामस्मरणाने पापांपासून मुक्ती मिळते.



# औषधांचा तुटवडा ३ आमदारांची समिती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
राज्यातील सर्व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयांत औषधांचा तुटवडा नेमका किती आहे. या बाबत विरोधी पक्षांच्या आमदारांनी प्रश्न उपस्थित करण्यात आला. याची माहिती घेण्यासाठी ३ आमदारांची समिती नेमून पुढील १५ दिवसांत त्याचा अहवाल सादर करण्यात यावा, असे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत दिले.

या विषयावर आज सभागृहात विरोधी पक्षांच्या आमदारांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. या मुद्यावरुन नाना पटोले, अमित देशमुख, रोहित पवार यांनी प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, शिक्षकाच्या आत्महत्या प्रकरणावरून विरोधी पक्षातील आमदारांनी आज विधीमंडळ सभागृह आणि परिसरात घोषणाबाजी केली.

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यावर विश्वासदर्शक प्रस्ताव मंजूर

**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यावर संपूर्ण विधान परिषद विश्वास व्यक्त करीत असल्याचा विश्वासदर्शक प्रस्ताव आज सभागृहात मंजूर करण्यात आला. भाजप गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी हा प्रस्ताव विधान परिषदेत मांडला होता.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गो?हे यांच्यावर ही विधान परिषद पूर्ण विश्वास व्यक्त करत आहे, असा एक ओळीचा प्रस्ताव आ. दरेकर यांनी सभागृहात मांडला. यानंतर विधान परिषदेचे सभापती यांनी हा प्रस्ताव मतासाठी ठेवला. आवाजी मतदानाने सभागृहाने हा प्रस्ताव मंजूर केला. यानंतर सभापतींनी प्रस्ताव मंजूर झालेला आहे अशी अधिकृत घोषणा केली. यासोबतच उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यावर विधान परिषदेचा पूर्ण विश्वास असल्याची अधिकृत नोंद झाली.

## जिजाऊ समाधीस्थळाच्या पुनर्विकासाचा आराखडा तयार - शेलार

**मुंबई :** रायगड किल्ला आणि जिजाऊ समाधीस्थळाच्या पुनर्विकासाचा एकत्रित आराखडा तयार असून त्यात सिंदखेडराजा इथल्या जिजाऊंच्या जन्मस्थळाचाही समावेश केला जाईल, अशी माहिती मंत्री शेलार यांनी सभागृहात दिली. रायगड जिल्ह्यात पाचाड इथे राजमाता जिजाऊ समाधीस्थळाच्या विकासासाठी आवश्यक ती सगळी कामे तातडीने करण्यात येतील, असे सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी सांगितले.

## राजमाता जिजाऊ यांच्या स्मारकाशेजारी सुविधा द्या - दानवे

**मुंबई :** राजमाता जिजाऊ यांच्या समाधी स्थळाशेजारी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग आणि राज्य पर्यटन विभागाची जमीन जवळजवळ आहे. स्मारकाशेजारी लागणाऱ्या पायाभूत आणि मूलभूत सुविधा भारतीय पुरातत्त्व संरक्षण विभाग करत नसेल तर राज्य शासनाने सुविधा निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा निर्माण करण्यासाठी विशेष कार्यक्रम सुरू करणार का? असा प्रश्न अंबादास दानवे यांनी विधान परिषद सभागृहात उपस्थित केला.

# फहीम खानवर जमाव जमवल्याचा ठपका

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १९ :**
नागपूर हिंसाचाराप्रकरणी पोलिसांनी दाखल केलेला हिंसाचार समोर आला आहे. त्यात ३८ वर्षीय फहीम खान नामक व्यक्तीवर जमाव गोळा केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. पोलिसांनी फहीम खानचा उल्लेख मास्टरमाईंड म्हणून केला आहे. त्यामुळे तोच या प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नागपूरमध्ये सोमवारी रात्री भयंकर हिंसाचार झाला होता. त्यात अनेक वाहनांची जाळपोळ करण्यात आली होती. या घटनेत उपायुक्त दर्जाच्या ४ अधिकाऱ्यांसह एकूण ३३ पोलिस जखमी झाले होते. हिंदुत्ववादी संघटनांनी मुघल बादशहा औरंगजेबाची प्रतिकात्मक कबर जाळल्याच्या मुद्यावरून ही घटना घडली होती. पोलिस या घटनेमागे असणाऱ्या व्यक्तीचा कसून शोध घेत होत. हा शोध आता फहीम खानपर्यंत जावून पोहोचला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, फहीम खान हा ३८ वर्षीय व्यक्ती नागपूर हिंसाचाराला कारणीभूत आहे. त्याने लोकांची माथी भडकवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर हा हिंसाचार घडला. नागपूरच्या गणेशपेठ पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आलेल्या तक्रारीमधून त्याचे नाव समोर आले.




## हिंसाचाराचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप

फहीम खान हा मायनॉरिटी डेमोक्रॅटीक पार्टीचा शहराध्यक्ष आहे. त्याच्याच नेतृत्वात पोलिस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला होता. आता त्याच्यावर कडक कारवाई होण्याची शक्यता आहे. तूर्त पोलिसांनी या प्रकरणी जवळपास ४६ आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. या दंगेखोरांना कोर्टाने २१ मार्चपर्यंतची पोलिस कोठडी सुनावली आहे.

**कोण आहे फहीम खान?**
पोलिसांच्या माहितीनुसार, फहीम खान हा मायनॉरिटी डेमोक्रॅटीक पार्टीचा शहराध्यक्ष आहे. त्याचे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. हिंसक जमाव त्याच्याच नेतृत्वात पोलिस ठाण्याला निवेदन देण्यास गेला होता. त्याने सोमवारी सर्वप्रथम लोकांना सोमवारी सकाळी ११ वा. एकत्र येण्याचे आवाहन केले.

### ११ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी कायम

नागपूर शहरातील झोन क्रमांक ३, ४ आणि ५ या भागातील ११ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. गरज नसताना या भागातील लोकांनी घराबाहेर निघू नये, तसेच पाचपेक्षा जास्त लोकांनी जमू नये, असे आदेश पोलिसांकडून देण्यात आलेत. उर्वरित नागपूरमध्ये जनजीवन सामान्य आहे. सार्वजनिक वाहतूक सेवा सुरु असून लोक नेहमीप्रमाणे कामासाठी बाहेर पडत आहेत. शहरातील काही भागात तणावपूर्ण शांतता कायम असल्याचे दिसत आहे.

यावेळी त्याने विहिंप व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांविरोधात नारेबाजी केली. त्याच्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पण त्यानंतरही फहीम खानने जमाव गोळा करून तनाव निर्माण करण्यास सुरुवात केली. फहीम खान जमावाला हिंसाचार करण्यासाठी प्रवृत्त करत होता. पोलिस हिंदू समाजाचे आहेत. ते आपली मदत करणार नाहीत, असे तो जमावाला उद्देशून म्हणाला होता. मागील विधानसभा निवडणूक त्याने लढवली. पण त्याला पराभवाचा सामना करावा लागला.

# भाजपा गठित करणार तृतियपंथीयांची आघाडी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
वंचित आणि उपेक्षित वर्गांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कटिबद्ध असलेली भारतीय जनता पार्टी (भाजपा) आता तृतियपंथी समाजाच्या समस्यांना हात घालणार आहे. या समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी लढण्याच्या उद्देशाने लवकरच भाजपातर्फे तृतियपंथीयांची आघाडी स्थापन करण्यात येणार आहे.

ही घोषणा भाजपा प्रदेशाध्यक्ष आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित एका कार्यक्रमात केली. या कार्यक्रमात राज्यभरातील अनेक तृतियपंथी व्यक्तींनी बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला, ज्यामुळे हा कार्यक्रम चर्चेचा विषय ठरला.

या कार्यक्रमाला भाजपा प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आणि प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. या प्रसंगी राज्यभरातून आलेल्या तृतियपंथी व्यक्तींमध्ये कोल्हापूरच्या मयुरी आळवेकर, नागपूरच्या राणी ढवळे, बेबी नायक, धुळ्याच्या पार्वती जोगी, प्रेरणा वाघेला, पुण्याच्या कादंबरी यांच्यासह अनेकांचा समावेश होता.

बावनकुळे यांनी सांगितले की, तृतियपंथी समाजातील जवळपास ५० प्रमुख कार्यकर्त्यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून अधिकार दिले जातील. तसेच, प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुखांना पक्षात प्रतिनिधी म्हणून योग्य स्थान मिळेल. तृतियपंथी आघाडीत एक प्रमुख, एक संयोजक आणि ५ ते ६ सहसंयोजकांची नियुक्ती केली जाईल. राज्यभरातील सुमारे ५ लाख तृतियपंथी व्यक्तींनी भाजपाचे सक्रिय सदस्य व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या प्रसंगी बोलताना डॉ. सान्वी जेठवाणी म्हणाल्या, आमच्या या दुर्लक्षित समाजाचे प्रश्न सोडवण्याची क्षमता भाजपामध्ये आहे, असा विश्वास आम्हाला वाटतो. म्हणूनच आम्ही तृतियपंथी समाजातून भाजपाला साथ देण्यासाठी पुढे आलो आहोत.

# सत्ताधारी पक्षाला पाशवी बहुमताचा माज

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९ :**
महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे सभागृहाचे कामकाज करताना पक्षपाती व एकांगीपणे कामकाज चालवत आहेत. सभागृहाचे कामकाज नियमानुसार होत नाही. विरोधी पक्ष व विरोधी पक्षनेते यांचे हक्क डावलले जात असल्याने त्यांनी सभागृहाचा विश्वास गमावला आहे, त्यामुळे त्यांच्यावर महाविकास आघाडीच्या आमदारांनी अविश्वास ठराव मांडत त्यांना पदावरून दूर करण्याची मागणी विरोधी पक्षाने केली आहे.


दानवे आक्रमक

महाविकास आघाडीने उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात ५ मार्चला नियमाप्रामाणे प्रस्ताव दिला होता. मात्र सभापतींनी मंगळवारी तो फेटाळला.

आज कार्यक्रमात नसताना भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी उपसभापतींवर विश्वास प्रस्ताव ठेवला. तसेच विरोधी पक्षनेत्याला आपली भूमिका मांडू दिली नाही. त्यामुळे आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी सभात्याग केला. तसेच याचा निषेध म्हणून उद्या काळ्या फिती लावून कामकाजात सहभागी होणार असल्याची माहिती दानवे यांनी दिली.

एकप्रकारे सत्ताधारी पक्षाला पाशवी बहुमताचा माज चढला आहे. त्यांनी विरोधकांची भूमिका मांडू न देता रेटून प्रस्ताव नेला, विरोधी पक्षाला बोलू न देणे हे लोकशाहीला बाधक असल्याचेही अंबादास दानवे यावेळी म्हणाले.


■ **नागपूर :** राज्याचे महसुल मंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना प्रभू श्रीरामचंद्राची प्रतिमा असलेले स्मृतीचिन्ह भेट देण्यात आले .याप्रसंगी दैनिक महासागर वृत्तपत्र समुहाचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी यु. एस. लाल, नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार प्रविण डबली, खनकर, जनसंपर्क अधिकारी कमलनारायण नामपल्लीवार उपस्थित होते.

: लोकसेवार्थ :

# २०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा योजनेवर प्रकाशझोत

भारतातील ॲक्च्युअरीजसाठीची प्रमुख व्यावसायिक संस्था, द इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्च्युअरीज ऑफ इंडिया (आयएआय) ने १८ मार्च २०२५ ते १९ मार्च २०२५ दरम्यान द वेस्टिन, मुंबई येथे ॲक्च्युअरीज एक्सलन्स इन द एज ऑफ डिसर्पशनर या विषयाला अनुसरून २४ व्या वार्षिक जागतिक ॲक्च्युअरीज परिषदेला यशस्वीरित्या सुरुवात केली. हा कार्यक्रम विमा, पेन्शन आणि वित्तीय क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी एक प्रमुख व्यासपीठ आहे, ज्यामुळे संस्थांना उद्योगातील अग्रणी व्यक्तींशी संवाद साधता येईल आणि त्यांच्यासोबत संबंध आणि सहकार्याच्या संधी वाढवता येतील.




लोकजागर

कार्यक्रमाची सुरुवात अनुक्रमे जीसीएचे अध्यक्ष श्री सुनील शर्मा आणि आयएआयच्या अध्यक्षा श्रीमती प्रीती चंद्रशेखर यांच्या स्वागत भाषणाने झाली. या कार्यक्रमाचे मुख्य भाषण वित्तीय सेवा विभागाचे सचिव एम. नागराजू, पीएफआरडीएचे अध्यक्ष डॉ. दीपक मोहंती आणि एलआयसी ऑफ इंडियाचे सीईओ आणि एमडी सिद्धार्थ मोहंती यांनी केले. या सत्रांमध्ये व्यवसायाचे भविष्य निश्चित करणारे चालू मुद्दे समाविष्ट होते, जसे की पुनर्विमाची भूमिका - २०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा, आरबीसी आणि भांडवल कार्यक्षमता नष्ट करणे, आणि क्रॉसरोड्समध्ये एआयः वित्तीय सेवांमध्ये उदयोन्मुख सायबर धोके हाताळणे. या सत्रांमध्ये उद्योगाबाबतीत कल, आव्हाने आणि संधींबद्दल महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी प्रदान करण्यात आली.

वित्तीय सेवा विभागाचे सचिव एम. नागराजू, आयएएस यांनी त्यांच्या प्रमुख भाषणाने परिषदेचे उद्घाटन केले. ते म्हणाले, २०२७ पर्यंत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना आवश्यक संरक्षण प्रदान करण्यासाठी ॲक्च्युअरील व्यवसाय हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. सरकारी यंत्रणा आणि पाठबळाच्या अंतर्गत धोक्याचे मूल्यांकन आणि शमन करण्यात ॲक्च्युरियल व्यवसाय हा महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

परिषदेला संबोधित करताना, आयएआयच्या अध्यक्षा प्रीती चंद्रशेखर म्हणाल्या, आपण व्यवसायाच्या शाश्वत विकासासाठी नवोपक्रम, सहकार्य आणि मूल्य निर्मितीच्या त्रिवेणी संगमावर आहोत. 'व्यत्ययाच्या युगात ॲक्च्युअरीअल एक्सलन्स' हा विषय तंत्रज्ञान, हवामान बदल आणि बदलत्या वित्तीय प्रणालींमुळे वेगाने बदलणाऱ्या जगात ॲक्च्युअरीनी कार्य करण्याचे आवाहन अधोरेखित करतो. या परिषदेत जोखीम व्यवस्थापन, डेटा विश्लेषण आणि शाश्वत आर्थिक पद्धतींमध्ये ॲक्च्युअरी कसे भरभराट करू शकतात यावर चर्चा करण्यात आली.

परिषदेतील प्रमुख ठळक मुद्दे म्हणजे धोरणकर्ते आणि जागतिक तज्ञांचे विचारप्रवर्तक सत्रे, ॲक्च्युअरील प्रगती, जोखीम व्यवस्थापन आणि वित्त यावरील पॅनेल चर्चा, उद्योग नेते आणि व्यावसायिक भागीदारांसह संबंध प्रस्थापित करण्याची संधी आणि महत्त्वाचे म्हणजे, उदयोन्मुख कल आणि नियामक विकासांबद्दल विशेष अंतर्दृष्टी आहे. ■ ■

# फास्ट फुडला हेल्दी पर्याय 'पिंक्चेट बाईट'



हल्ली सगळीकडे हेल्दी सलाड किंवा ह्याडाएट फूड खाण्यासाठी लोकांची पसंती असते. परंतु हेल्दी फूड हे ऑथेंटिक आहे का नाही? याची शाश्वती फार कमी ठिकाणी मिळते. हेल्दी आणि ऑथेंटिक फूड देण्यासाठी स्नेहल पेंढारकर आणि अनुपम पेंढारकर या दाम्पत्यांनी पिंक्वेट बाईटला सुरूवात केली आहे.

वयाच्या चाळीशीमध्ये नोकरी सोडून या दोघांनी व्यवसाय सुरू करण्याचे धाडस केले. तसेच ते यशस्वी सुद्धा करून दाखवले आहे. बाजारामध्ये अशा प्रकारचे फूड उपलब्ध आहे का याबाबत बरेच संशोधन त्यांनी केले. परंतु व्यवसाय सुरू करताना परिपूर्ण असा आराखडा तयार नव्हता. आपला व्यवसाय यशस्वी कसा होणार याबद्दल ९० टक्के व्हिज्युअलायजेशन मात्र होते. नोकरी सोडल्यानंतर व्यवसाय सुरू करेपर्यंतची प्रक्रिया जलद गतीने पार पाडली. साधारण एक महिन्यामध्ये सर्व गोष्टी सेट केल्या.

सलाड म्हटले की ब्रोकोली, ऑलिव्ह यांसारख्या तत्सम भाज्या सुद्धा आपल्या डोळ्यासमोर हमखास येतात. परंतु भारतीय हवामानाप्रमाणे आणि आपल्या येथील लोकांच्या आरोग्याप्रमाणे भारतीय भाज्यांचा वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या ह्यसलाडह्यमध्ये लाल भोपळा, दुधी भोपळा, पडवळ अशा भाज्यांचा समावेश असतो. त्यासोबतच त्याला चव येण्यासाठी काही भाज्या सालासकट बारीक तुकडे करून



ओव्हनमध्ये भाजल्या जातात. ज्यामुळे लगेचच त्याच्या चवीमध्ये फरक पडतो.

प्रत्येक पदार्थामध्ये तेलाचे प्रमाण किती असावे, यासोबतच तो गॅसच्या किती आचेवर शिजवायचा याबाबतचे सर्व संशोधन पेंढारकर यांनी केले. व्यवसाय सुरू करण्याआधी रेसिपीबाबत अनेक लोकांकडून फिडबॅक घेतले.

यासाठी स्नेहल यांनी न्यूट्रीशनचा ऑनलाईन कोर्स देखील केला. त्यामुळे प्रत्येक गोष्टीची न्यूट्रीशन व्हॅल्यू काढून पदार्थ बनवला जातो. पेंढारकर यांच्याकडे सलाडचे आठवडा किंवा महिन्याला सबस्क्रिप्शन सुद्धा घेता येते. तसेच गरोदर स्त्रिया, मधुमेह असणाऱ्या पेशंटसाठी कस्टमाईज सलाड सुद्धा दिले जाते.

खास सलाडसाठी प्रत्येक रविवारी आठवड्याचे प्लॅनिंग केले जाते. त्यानुसार सलाडसाठी लागणारे सर्व सामान आणून ठेवले जाते.पेंढारकर यांनी व्यवसाय करायचे ठरवल्यानंतर क्लाऊड किचन होते; तसेच फक्त पिज्झा पासून सुरूवात केली होती. त्यासाठी पिज्झा बेस हा मैद्याऐवजी मल्टिग्रेन असायचा. याच पद्धतीने हळूहळू सर्व फास्ट फूडचे हेल्दी व्हर्जन आणले.

त्यामध्ये सोया न्यूडल्स; त्यामध्ये सर्व प्रकारच्या भारतीय भाज्यांचा वापर करण्यास सुरू केले. आपल्या शरीराला प्रोटीन्स बरोबरच मिनरल्सची सुद्धा आवश्यकता असते.

अशा अनेक गोष्टी गृहीत धरून व प्रत्येक पदार्थाची न्यूट्रीशन व्हॅल्यू काढून पास्ता, फ्रँकी, रोल्स अशा अनेक डिशेसही सुरू केल्या. खास करून कोरोना सुरू झाल्यानंतर अशा हेल्दी फूडची मागणी वाढली.

त्यानंतर त्यांनी स्वतःचे आऊटलेट सुरू केले. त्याला सुद्धा लोकांचा अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला; त्यामुळे त्यांनी दुसरे आऊटलेट सुद्धा सुरू केले; तसेच आता तिसरे आऊटलेट सुद्धा लवकरच सुरू होणार आहे.. या प्रमाणे प्रत्येक गोष्टीचे नियोजन असल्यास आपला व्यवसाय प्रगती पथावर येण्यासाठी वेळ लागत नाही.

■ ■ ■

### शब्दार्थ
**CII**
CII चे पूर्ण रूप भारतीय उद्योग परिसंघ (Connederation of Indian Industry) आहे. CII ही भारतातील एक प्रमुख उद्योग संस्था आहे, जी उद्योग, सरकार आणि नागरी समाजाला एकत्र आणण्याचे काम करते. या संस्थेचा उद्देश भारतातील उद्योगांसाठी अनुकूल वातावरण तयार करणे आणि टिकवून ठेवणे आहे. CII ही एक गैर-सरकारी, गैर-नफा, उद्योग नेतृत्व आणि उद्योग व्यवस्थापित संस्था आहे.
■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# मुंबईत १८२० महिलांसाठी फक्त १ सार्वजनिक शौचालय

## चित्रा वाघ यांनी मांडला विषय

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९ :**
मुंबईसह राज्यातील महिलांसाठी मोफत सुरक्षित आणि स्वच्छ सार्वजनिक स्वच्छतागृहे आवश्यक असल्याचे आमदार चित्रा वाघ यांनी सभागृहात म्हटले आहे. महिलांचा बरेच वर्षे दुर्लक्षित प्रलंबित असलेला आणि अतिशय महत्त्वाचा असा प्रश्न म्हणजे स्वच्छतागृहांचा प्रश्न असल्याचे म्हणत त्यांनी आज विधानपरिषदेत हा विषय मांडला.

मुंबईत 1,820 महिलांसाठी फक्त 1 सार्वजनिक शौचालय उपलब्ध असल्याचे धक्कादायक वास्तव असल्याचे त्यांनी सभागृहासमोर सांगितले. शौचालयांची अपुरी संख्या, अस्वच्छता आणि सुरक्षिततेचा अभाव यामुळे महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामुळे आज राज्यातील महिलांसाठी मोफत सुरक्षित आणि स्वच्छ सार्वजनिक स्वच्छतागृहांची मागणी त्यांनी केली.

तर केवळ शौचालये बांधून त्याचे प्रश्न सुटणार नाहीत. शहरी, निमशहरी व ग्रामीण भागातील महिलांच्या स्वच्छतागृहांचे प्रश्न आणि समस्या वेगळ्या आहेत. राज्यातील सर्व महिला स्वच्छतागृहांचा शासनाने सर्वे करावा आणि त्यानुसार धोरण आखावे, अशी मागणी देखील त्यांनी केली.

# चहल-धनश्रीच्या घटस्फोटावर आज निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा यांच्या घटस्फोटाच्या याचिकेवर उद्या निर्णय घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कुटुंब न्यायालयाला दिले आहेत. न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकल खंडपीठाने सांगितले की, चहल २१ मार्चपासून उपलब्ध राहणार नाही, कारण त्याला आयपीएलमध्ये भाग घ्यायचा आहे.

रिपोर्टनुसार, चहल त्याच्या पत्नीला सुमारे ५ कोटी रुपयांची पोटगी देईल. घटस्फोटाच्या याचिकेनंतर चहल आणि धनश्री यांनी ६ महिन्यांचा कूलिंग ऑफ पीरियड माफ करण्याची केलेली विनंती मुंबई उच्च न्यायालयाने मान्य केली आहे. चहल आणि धनश्रीचे डिसेंबर २०२० मध्ये लग्न झाले.

अलिकडेच असे वृत्त आले होते की दोघेही गेल्या १८ महिन्यांपासून वेगळे राहत होते. चहल आणि त्याची पत्नी धनश्री यांच्या घटस्फोटाच्या अफवा बऱ्याच काळापासून सोशल मीडियावर फिरत होत्या. तथापि, चहल आणि धनश्री यांचे अधिकृत विधान अद्याप समोर आलेले नाही.

झलक दिखला जा-११ च्या एका भागात धनश्री वर्माने युजवेंद्र चहलसोबतच्या तिच्या प्रेमकथेचा खुलासा केला.



२०२३ मध्ये, युजवेंद्र चहलने त्याच्या सोशल मीडियावर एक गोष्ट शेअर केली, ज्यामध्ये त्याने लिहिले, एक नवीन जीवन येत आहे. यानंतर, अभिनेत्री धनश्रीने तिच्या इंस्टाग्राम युजरनेममधून चहल हे आडनाव काढून टाकले. यानंतर, त्यांच्या घटस्फोटाच्या अफवा तीव्र झाल्या. तथापि, नंतर क्रिकेटपटूने घटस्फोटाच्या बातम्यांना अफवा असल्याचे म्हटले.

युजवेंद्र चहल सध्या टीम इंडियाच्या बाहेर आहे. त्याने भारतासाठी शेवटचा एकदिवसीय सामना जानेवारी २०२३ मध्ये खेळला होता,

# मामा-भाच्याच्या जोडीचा सीएमआर मिलींगमध्ये धुडगूस

■ **महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. १९ :**
शहरातील मामा-भाच्याच्या जोडीने सीएमआर मिलींग मध्ये अक्षरशः धुडगूस घातला असून तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मेहरबानीने मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ सरकार जमा केला जात आहे. तथापि, संबंधित विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने पुरवठा विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह लागले आहे.

देसाईगंज शहरातील एक राईसमिल संचालक २०२१ पासून सातत्याने गडचिरोली जिल्ह्यात पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यवधीचा निकृष्ठ तांदूळ शासन जमा करीत आहे. शासकीय धान खरेदी केंद्रावरुन उचल केलेल्या धानाची लगतच्या जिल्ह्यात तसेच छत्तीसगड राज्यात विक्रीकरिता नेत असतांना पोलिसांनी रंगेहाथ पकडले होते.

देसाईगंज येथील तंबाखू लाईनमध्ये दुकान थाटून बसलेला मामा सर्रास रेशनचा तांदूळ खरेदी करून भाच्याच्या मिलमध्ये जमा करतो आणि त्यापासून तयार तांदूळ सरकारी बारदान्यात भरून सरकार जमा करण्यात येत आहे. मामा-भाच्याच्या कारनाम्यामुळे गोरगरीबांना रेशन दुकानातून खाण्यास अयोग्य तांदुळ मिळतो. परिणामी, आहारात वापरण्याऐवजी लाभार्थी त्याची विक्री करतात.

गडचिरोली जिल्ह्यात सीएमआर मिलींग मध्ये एकाधिकार मिळविण्यासाठी भाच्याने चक्क शासकीय धान खरेदी अभिकर्ता संस्थेचे व्यवस्थापक व पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासकीय धान खरेदी केंद्रावरुन धानाचे लाट मिळवून देण्याकरिता प्रती लाट ४० हजार तर खुल्या बाजारातुन जमा केलेला निकृष्ठ दर्जाचा तांदूळ शासन जमा करण्याकरीता ४० हजार असे प्रती लाट ८० हजार रुपये सीएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्स कडुन वसूल करत आहे.

यात मामा रेशनच्या तांदळाची खरेदी करण्याचा व्यवसाय थाटून बसला असून सीएमआर मिलींग करू इच्छिणाऱ्या राईसमिलर्स सोबत सेटिंग लावून देण्याचे काम करून प्रसंगी चोरी पकडल्या गेल्यास दलालाची भुमिका बजावत असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान पणन हंगाम -२०१७-१८ ला कुरखेडा येथील शासकीय गोडाऊन मध्ये देसाईगंज येथील भाशाच्या मिलचे ३ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०१८ च्या दरम्यान देसाईगंजचे तत्कालीन तहसीलदार डी. टी. सोनवाने व गडचिरोलीचे तत्कालीन निरिक्षण अधिकारी बारदेवार यांनी चौकशीत मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ पकडून प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्तावित केले होते.

तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त नागपूर यांचेकडे पाठविलेल्या अहवालातून देसाईगंज तहसील कार्यालयातील तत्कालीन निरीक्षण अधिकारी अप्पासाहेब के.पाटील यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ अन्वये कारवाई करण्याची विनंती केली होती.

२४ फेब्रुवारी २०२२ रोजी गडचिरोली येथील शासकीय गोदामात यांचा मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गडचिरोली येथील नागरिकांनी रंगेहाथ पकडले असता तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी आरमोरी येथील शासकीय गोदामात कार्यरत पुरवठा निरीक्षक युवराज बोरकर यांचेवर कारवाई न करता त्यांना अभय देऊन ६८ हजार ४६० रुपयाचा दंड ठोठावला होता.

सदर प्रकरण महाराष्ट्र विधानपरिषद २०२२ च्या अर्थसंकल्पात विधानपरिषद सदस्य डॉ. परिणय फुके यांनी लक्षवेधी सुचना लावलेली होती.तसेच विधानपरिषद सदस्य प्रविण दरेकर यांनी जिल्हाधिकारी गडचिरोली यांना देसाईगंज येथील भाशावर मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ प्रकरणी कडक कारवाई करण्यासंदर्भात पत्र दिले होते. मात्र, पैशाच्या जोरावर आणि राजकारण्यांच्या छुप्या पाठिंब्यामुळे मामा-भाच्याचे अद्याप कोणीच काही वाकडं करू शकले नाही. सद्यःस्थितीत विधानसभेत गाजत असलेल्या सीएमआर मिलींग घोटाळ्या पडसाद उमटत असून, या प्रकरणात संभाव्य कारवाई आणि गुन्हे दाखल होण्याच्या भितीने मामा-भाच्याकडून आपल्या बचावासाठी मोठ्या प्रमाणात धावपळ सुरू झाली आहे.